म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २५२९

# मूर्ति भंजन

REFBK-0024656

संदर्भ काव्य
२५४८
३७६५६
७६२०२५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. २५४८
३७६५६
७६२०२५
ग्रंथ
शाखा
१९४८

# मूर्तिभंजन

यशवन्त मनोहर

REFBK-0024656

REFBK-0024656

श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

प्रकाशक
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

© सौ. पुष्पलता मनोहर
अ/३ विद्यापीठ प्राध्यापक निवास
अमरावती मार्ग, नागपूर १०

प्रकाशन काल
प्रथमावृत्ती १४ एप्रिल १९८५
आंबेडकर जयंती

मुखपृष्ठ : कमल शेडगे

मूल्य : तीस रुपये

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ सदाशिव पेठ,
पुणे ३०

संग्रहालय ठाणे
ग्रंथ शाखा

प्रा० शरच्चंद्र मुक्तिबोध
यांना

‘ उत्थानगुंफा ’ आणि ‘ डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक चिंतन काव्य ’ यांच्यानंतरचा हा माझा काव्यसंग्रह. उत्थानगुंफेपूर्वीच्याही काही कविता या संग्रहात समाविष्ट केल्या आहेत.

हे वेळोवेळीचे फुटणे–प्रस्फुटणे !

मधुकाका कुलकर्णी यांनी हा संग्रह अगत्याने प्रकाशनासाठी स्वीकारल्याबद्दल मी त्यांचा विशेष आभारी आहे.

नागपूर
२२ मार्च १९८५

—यशवन्त मनोहर

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| कोणत्याही क्षणी चवताळतात आग लावतात | १ |
| जीव झाला रानभरी | २ |
| बोलली नाही तुझी प्राजक्तगुंफा | ३ |
| शब्द माझे आंधळे भिक्षेकरी | ४ |
| तुला केवळ कशी कळेना | ५ |
| अशी चटक चांदणी | ६ |
| एक कोवळी दुपार | ७ |
| वाट डोळियात जिती | ८ |
| या इथे निदर्य तमातून | ९ |
| खिन्न नजरेच्या चिंध्या वेचताना | १० |
| वेदनांच्या लाटांतून | ११ |
| कदाचित माझा तिरडीवरला प्रवास | १२ |
| असा जागलो जगलो | १३ |
| माझा प्रारंभच ठेचाळला रक्तसमुद्राला | १४ |
| तू तुझ्यापासून सुरू झाली नाहीस | १८ |
| तू परदेशी पौर्णिमा अंजिरी | २० |
| चंद्र कलावा थोडा | २१ |
| तो जुळवीत होता अनोख्या उत्सवासाठी पाचोळा | २२ |
| सुस्तावून पडलेली वेगवती खळखळ | २३ |
| उशाला आता भूतकाळ फडफडतो | २४ |
| ती जीवनातून ओघळून गेली | २५ |
| तू हिरवा चाफा | २६ |
| तिच्याही पेक्षा | ३१ |
| हा रस्ता तेव्हा माझ्या उरात होता | ३२ |
| तुटत तुटत आलेली तार | ३३ |
| आश्चर्यदग्ध डोळ्यांनी प्रथम तुला पाहिले | ३४ |
| तू मृत्यूचे महावाक्य | ३५ |
| हा पदर मेघांचा तुझ्या दिशेवर | ३६ |
| जखमांची सवय होत नाही क्षितिजांना | ३७ |
| सकाळपासून | ३८ |
| माझ्या प्रतीक्षेत भर काळोखात मांडलेले | ३९ |

थांबवता येत नाही उच्छ्वासाबरोबर ओघळणारे रक्त ४०
आता तू जपायला हवीस ४१
मी आयुष्य निःश्वासांच्या हवाली केले ४२
पुढे सदासाठी मेलेली आवडत्या संदर्भांची सोबत ४३
कसे पडावे बाहेर या निर्वात लोखंडी तुरुंगातून ४४
झाडाच्या प्रत्येकच पानाला बाण मारलेले ४५
जळता गळा दिला अंधाराच्या हातात ४६
हे रक्त माझ्या अस्तसन्मुखतेत गदगदून फुटतंय ४७
नंतर मुके झाले रक्त मांस ५०
दुःख खात असते शब्दांना आत दिशा ओस ओस असतात ५१
लाखदा वाटले फेकून द्यावीत ही पानांची देठं ५२
ओततो सागरामागून सागर ५३
आपण संदर्भ उभे करतो आपल्या संदर्भात ५४
कधी अशा अनपेक्षित सुखांनाही अनिच्छेने ५५
पहाटे आधीच झालीस रक्ताची रहिवासी ५६
जन्मतःच चौकटबंद मी अभावाच्या पार्श्वभूमीत ५७
गुदमरतो गुदमरतो आज जीव जसे विष अंगभर झाले ५८
तुझ्या सदिच्छांनीही ५९
एका प्रलयापोटी जन्मलेली ही कहाणी ६१
काळोखाच्या पुरावरी बसविले गावा ६२
निखाऱ्यांचे शेत व्हावे माझे मन ६३
झालो मी येथल्या नंग्यांचा सांगाती ६४
चिता करोनी आयुष्याची उजळियली वाट ६५
मी येतो तेव्हा तुमची ६६
हा अजूनही न उगवलेल्या वर्षाचा पहिला दिवस ६७
शेण खाऊनी नीती उजागर ६९
सत्य मागते निदान वारा ७०
ही एक लहानपणाची गोष्ट ७१
आकाश फिरले एकाएकी फाटत गेल्या रेषा ७२
हे कर्कवृत्त, हे मकरवृत्त ७३
हे कर्कवृत्तपत्र, हे मकरवृत्तपत्र ७५
तासापूर्वी पिलांसोबत रुखीसुखी भाकर खाणाऱ्या ७६
घशात अंधार पडू लागला ७७
हवा निष्प्राणून आणि वांझ ढगांच्या ७८

त्राण नसताना बेभान झाल्याची विग-वल्गना ७९
आणखी वेगळाच काळोख ८०
चोराला भेटतो मलिदा म्हणून चोरी करू नको ८१
आपलेच काळीज खात राहावे ८२
घशात घुसेल ते विष गोड करून घेत जावे ८३
चिखलात उगवलो आणि अंगात चिखल नाही ८४
ते कुणालाही देवबाप्पा म्हणतात. बाप म्हणतात ८५
मान वळवून पाहात ढगांची लालसा ८६
जयाचे आयु उदंड ८८
एकूदी अवघी सदुर्बळू पोरे त्रस्त जाहली ८९
आता सांगावे तरी काय, ऐकावे तरी काय ९०
त्या वाड्याकाठून रस्ते खाणारी झाडे ९२
कोसळेल गगन, उठतील जाळ पायापुढे ९४
कवटाभर वर्षापासून हे कबंध दारात ९५
इथे भिजले तिथे रुजले कुठे निजले रक्तात ९६
विजयासाठी आभाळाची बकरी करताना ९७
क्षणाक्षणा हेचि समुद्रमंथन ९८
जन्मते बखर रंकांच्या युद्धाची ९९
बांधोनी धरण सडवले मेघ मरणासी संग सिद्धविला १००
बोलवाया आले अनोळखी स्वप्न १०१
लबाडांच्या घरी कोल्हे कारभारी १०२
जिथे थांबला दिवस। तिथे थांबलो मी नाही १०३
जोडुनी ठिकऱ्या जुळविला गळा १०४
आले या कवेला लाव्ह्याचे आधण १०५
न गाई कदापी नरकाची स्तोत्रे १०६
कशाला काढावी मयसभा खणून १०७
माझ्या देशा १०८
शक्य झाले असते तर ११४
ठेकेदार न म्हणोत मला कवी, गाडोत उपेक्षेच्या खंदकात ११८
क्रांती–सावित्री ११९
वेगळे नव्हतेच तुझ्या पदरातले तुझे वसंत आणि शिशिर १२५
उरातील उग्रते १२६
पाय ठेवला नाही ज्या बनवेशाहीने १२७

# मूर्तिभंजन

ग्रंथालय ठाणे
२५२९
ग्रा. क्र. २२६५६
काव्य

कोणत्याही क्षणी चवताळतात आग लावतात
आयुष्यभर मनात गाडलेली स्मशाने
नव्या क्षितिजाच्या कवेतही कुंजवताना
देठ देठ पीत राहतात जखमांची गायने

फुटणारी थोपवू शकत नाहीत गळत्यांना
आणि दोन्ही दिशांची शोकदग्ध होतात पाने
रस्त्यातील मरणांच्या कमानीही कधी जपतात
तळहातीच्या लाडक्या फोडाप्रमाणे.

इवल्या इवल्यानेही रक्तात सुरू होते अथांग
जीवघेण्या स्वरांचे नवनवे क्रूर कोलाहल
जिवंतून नाचतात सळाळतात प्रिय ओठ
स्वप्नांना संजीवनी देते गुणगुणते हलाहल

महासुरुंगांनीही फुटत नाही मनाचा पाषाण
येत नाही वेळी कधी, पत्रही देत नाही पाऊस
कधी दरेकच क्षण होतो तीव्र कोसळते आभाळ
कधी प्रत्येकच रक्तथेंबाची ज्वालामुखीगत उकळते कूस

जीव झाला रानभरी
तेव्हा लिहिली कविता
शब्द शब्द उणा गेला
ओल्या जखमा शिवता

कुण्या अबोलिच्या साठी
प्राणांची ही उधळण
असे हसता हसता
माथी घेतले मरण

मला लिहिते कविता
गातो जखमांचा थवा
ऐशि मैफिल ही माझी
माझ्यापुरता वणवा

शब्द माझे आंधळे भिक्षेकरी
जीव अंथरती तुझ्या वाटेवरी
थांब केव्हा आसवांच्या उत्सवाशी
माळू दे मज चांदणे दु:खावरी

तुलाच केवळ कशी कळेना
अंधाराची ओढ कलंदर
निळ्या उन्हाची अशब्द तगमग
सावलीत रेखाया नवखी नक्षी गुलाबी
आसुसलेले डहाळीभवती चंद्रकवडसे
लाटांमधुनी कुरवाळीत किरणांचे लाघव
खोल जळाचे पिसाटलेपण
उधान भरती.
कसे कळेना, तुलाच केवळ कसे कळेना
क्षितिजातील रंगांचे कुढते व्याकूळ वादळ
तुझ्याच एका शब्दाखातर अवकाशाभर
पदर जिवाचा पसरू जगतो तिमीर केवळ
कशी कळेना या वाऱ्याची हिरवी भाषा
पानोपानी हुरहुरणारी आतूर थरथर
नसानसांचा टाहो घेऊन भिरभिरणारा
झपाटलेल्या श्वासांचा मम सचिंत दर्वळ
कसे कळेना,
कसे कळेना तुलाच केवळ
तुझ्याचसाठी ओसरणारा
मी माझ्या प्राणांचा
हिरवा नवथर मोहोर...

अशी चटक चांद्‌णी
तिचं मोरपंखी नेसू
ओठ साखर-कलिका
त्यात मोगरिचे हसू

गाली गाभूळली लाज
झुले डोळ्यात पहाट
अशी लावण्य–अपूर्वा
उभी पौर्णिमा दारात

––आली वनामध्ये माझ्या
दर्वळला सोनचाफा
जाईखाली अधोमुखी
अशी अबोल चंद्रिका

एक कोवळी दुपार
एक सुगंधिता सर
कणाकणात पेरीत
गेली सुगंधी विखार

तेव्हापासून तिच्याशी
नाते जुळवित आलो
मोरचोचितली तृषा
वाळवंट व्याकुळलो

उभे शब्दात काहूर
कसे आवरू वाऱ्याला
रित्या क्षितिजाची आग
बिलगली वादळाला

वाट डोळियात जिती
आलो झडत जिथून
ठेचाळलो पदोपदी
रक्ताळले प्राण प्राण

लुळ्या पांगळ्या श्वासांचे
काय मानू उपकार
कुठे दिसेना आसरा
हाती गवसेना तीर

ओझे वाहून वाकलो
खचू लागले शरीर
कुठे चाललो कसासा
उभे फाटताना ऊर

बोलली नाही तुझी प्राजक्तगुंफा
डंख पंखातील नाही पाहिले
मी तरी वाऱ्यात नक्षी काढिली
आसवांनी श्वास मी शृंगारिले

या इथे निर्दय तमातून
सोसतो वळ वेदनेचे
वाट हंबरते दिशाहीन
प्रेत घेऊन भावनेचे

रात सरते हुंदक्यांनी
काठ निर्वातास नाही
पांढरा अंधार दिवसा
या उरातून पेट घेई

●

विस्कटले जरी स्वप्न जळातील
तरंग पडले मोडून माना
अंधाराच्या पुरात जळत्या
तृषाक्रान्त सोडिन क्षितिजांना

आभासांची उदास मखमल
उरी लपेटून अत्तर वलये
तुझ्या स्मृतींच्या डहाळीवरती
बांधीन नक्षत्रांचे सोहळे

चंद्र अस्तली वाट लक्षिता
निःश्वासातून कोसळताना
उरात झेलीन वीज मधाची
तुझ्या स्मृतींनी वादळताना

खिन्न नजरेच्या चिंध्या वेचताना
जखमांना पान्हा वेदनांचा

शब्दात बांधून रक्ताळले सूर
शोधिले जहर विसाव्याला

मी मला ठेविले मृत्यूच्या हातात
श्वासांची वरात गळताना....

●

कसा कधी झालो वादळीचा वारा
दिशांचा किनारा पार झालो

हरवल्या वाटा अतिताच्या बनी
काव्यांच्या कुरणी फाटलो मी

आता जोडू जाता चिंध्या चिंध्या जळ
शब्दामध्ये कळ सामावेना...

●

कुठल्या वाटेत हरवली वाट
अश्रू काठोकाठ हंबरती
वेचली झाडाने गळालेली पाने
मनीची मरणे झाकावया
ओसाडीच्या नेत्री तरी थेंबे वेड
स्वप्निल्याची जोड व्हावी जिवा...
झाल्यावरी आता मृत्यूचा दत्तक
कशासाठी भीक कुणापुढे.... !

वेदनांच्या लाटांतून
गाज जागते दुखरी
अशी फाटता पापणी
मेघ सांडतो दुपारी

सरणाच्या धुरामध्ये
पैलतीर बुजलेले
व्यथा पिऊन प्रथेची
ओठ माझे भाजलेले

असा सुसाट दरीया
तिरी अंधाराचे बन
जळे स्वप्नुली वाटुली
होडी फाटलेले मन

कदाचित माझा तिरडीवरला प्रवास—
सुरू असताना येशीलही
कदाचित पत्रांच्या फांद्यांना बिलगून
आकांत मांडशीलही
हवी तेव्हा धरती फाटलीच नाही तर
आकाशाच्या राखेचे घर बांधशीलही
कदाचित...
अवसेला डोळ्यांचेही कोळसे झाले
तर पाचोळा पेटवून देशीलही...

असा जागलो जगलो
लाटा लहरींचे जिणे
स्वप्नापल्याडचे होते
गळा फुलवीत गाणे

मोरपंखांनी पेटले
तेव्हा डोळ्यात नाचणे
कुंजवनात ओठांच्या
आग पिणारे चांदणे

असे चालता फुलता
गेली वाहून पहाट
काळोखाशी भरतीची
आता व्याकुळली वाट

माझा प्रारंभच ठेचाळला रक्तसमुद्राला
सनातन घाटात
मागच्या दरोडेखोर अंतराने
वाळवंट बांधले होते माझ्या अंकुरत्या पायात
तू झाडाखाली धरून ठेवीत होतीस
दुपारची सावली
मी निखाऱ्यांच्या पोटी जन्मत होतो
आणि शब्दात पेरीत होतो न पाहिलेली सावली
हिरव्या वयात पाचोळत
मी उन्ह-वाऱ्याच्या विरोधात डोलतो
कधी माथे फाटले कधी बेफाटले
दरवेळी कुठल्यातरी डोळ्यातही सलतो
तू पाहिलेस फार जवळचे
पायांपुरते नुसते
असे जीवघेणे डोळे तू वापरायचे नसते
मरणासाठी इतके सोपे करून ठेवायचे नसते.

●

सगळी अशुभे·भोवती नाचली संवेदनांच्या
सुन्न मेंदूला ऐकू येत राहिला फक्त
तुझ्या पावलांचा अस्पष्ट होत गेलेला आवाज
तू गेलीस चितेच्या ज्वाळांसारखी
तेव्हा मी चरकलो
अशुभाच्या पायांखाली अथांग चेंगरलो.

●

कधीतरी हातपाय कापलेली लाट येते.
हसता हसता खोल रडत राहणाऱ्या किनाऱ्यांपर्यंत
वेचून काढतो गुलमोहोर पिसाऱ्याचा पाचोळा
फक्तच शृंगारले जाते क्षितिज तिरडीवर
आणि तुझ्याच अदृश्य हातांच्या मदतीने
मी डोळ्यांचे धरण सावरतो.

●

तू विषण्णतेची छांदसी
की कल्पांताने आधीच झाली होतीस घामाघूम
तू करीत होतीस लगट दु:खाशी
सकाळ दुपार सारखी बोलत बसत होतीस अस्ताशी
दु:खाच्या वर्दळीसाठी तू घडवीत होतीस स्वत:ला
पक्क्या सडकेसारखी
तुला ज्ञात होती काळीज फुटणारी घटिका
तरी मरणाच्या सावलीतील प्रारंभापाशी तू झिम्मा मांडलास
या सुखाने मला अधिकच करकचून
जळत्या मेघांशी बांधले.

दोन जन्मांचे पीठपाणी
हाताच्या चुंबनाने एकजीव करीत
म्हणाली होतीस--
' तुमच्या कवितेचा पहिला श्रोता मीच असेन '
प्रिये, आता तू कितवी वाचक असतेस
माझ्या यातनांची.... ?

●

तुझ्यापर्यंत येणार नसली ही कविता
तरी तुझ्यासाठीच ती उधाणून आलेली आहे
काळजात सुरू झालेली आहेत स्मरणांची कारंजी
शब्द झाले आहेत उतट मधाची पोळी
आज मी पुन्हा वर्तमानातून वजा झालो आहे
फेकला गेलो आहे सुगंध भूमीच्या
हव्याहव्याशा जीव जाळत्या स्वप्नरेषेवर
आज सुगंधले आहे मन त्या ठेवणीतल्या पेटण्याने
दु:खे पेटली आहेत माझी आज त्या ठेवणीतल्या सुगंधाने

●

मी झालो कालांतरित
की गतकालच झाला आहे स्थलांतरित
आणि नाचतो आहे पिसारा फुलवून माझ्या
स्वप्नाच्या सांगाड्यात ?
काय झाले आहे प्रिये,
का असे रक्तांतील बीजांचे ताटवे जागावेत ?
कशासाठी आजच्या संदर्भांनी
मेलेल्या संदर्भांशी असे पाठच्या भावासारखे वागावे ?
की बदलत नसतात संदर्भ

आपणच वागतो बदलल्यासारखे
संदर्भांना देशोधडीला लावून ?
असेही असेल कदाचित,
तरी दोन काळांच्या गळ्यांना
अशी कोणती गवसली आहे सम... ?
की सामसूम हवा
अशी कात टाकलेल्या सापासारखी सळसळून उठावी
आणि रोमांचांनी फुलावीत संवेदनांची खिंडारे... ?

●

तक्रार नाही तुझ्याबद्दल
पुनः पुन्हा तर भेटतच असतेस,
माझ्या पडक्या क्षणांना.
‘ कधी लपेटती पाने होऊन ’
कधी पेटती फुले होऊन,
आता मीच झालो आहे तीव्र तक्रार माझ्यासाठी

●

खूप खूप धावले मन
आणि अर्ध्या वाळवंटातील विषुववृत्तावर पडले थकून
तू देतीस हात तर कदाचित
ऋतुपालट झालाही असता
परत नृत्य झाले असते आभाळ तारकांचे.
पण माझेच रुसले होते माझ्यावर नाते.
तुझ्या मनाच्या अधाशी पांगळेपणाने
हातही तुझे खाऊन टाकले होते.

●

कसे सांगू तुला
भोवळ आली आहे माझ्या शब्दपौर्णिमेला
शक्य तर पाहून घे कधी
अनंत हाकांनी कासावीस झालेल्या ओसाडीला.

●

तू तुझ्यापासून सुरू झाली नाहीस.
इथेच माझ्या अस्ताचे मर्म गहिवरले आहे
आणि मी तर माझ्यापासूनच आरंभलो होतो
इथेच तुझा परतीचा प्रवास
अधोरेखित दहिवरला आहे.

●

कधी कधी निरोपांनी
मला उकळत्या विषात तळले
.... की तुझे मन मासोळी झाले
उकळत्या वाळूत मरण कुशीत घेऊन तडफडले....

●

वैराण रस्ताही आता इथे संपला आहे
माझे प्रश्न केवळ चुळकाभर पाण्याखातर उभे
सुकल्या डोळ्यांनी.
आता मागे परतणे अटळ
त्याही दिशेने रस्ता संपला आहे
आणि मी उभा.
इथे आभाळही तडफडून
मरू लागले आहे !

अकस्मात तू येतेस
आणि तुझ्या श्रावणसहवासात माझे स्वप्नस्मशान
आसवांनी नाचते.

●

कधी रक्तवाहिन्यांमधून पेटतात आठवणी तुझ्या
हव्याशा नकोशा तरी हव्याशा.
कधी केवळ कळ्यांच्या
काही नुकत्याच उमलल्या दवभरल्या पाकळ्यांच्या

●

कधी गदगद पावसाळून येते अंतराळ
आणि ज्वालांना येते भरती
चिंब ओला मी जळत पाजळत

●

तू फुलवलेले डोळ्यातले हट्टी आभाळ
मावळत नाही अजून
हरवलेल्या नक्षत्रांची भरल्या डोळ्यांत रीती खूण

●

झाडे उन्मळून टाकणारे वादळ
कवटाळले मी भरल्या डोळ्यांनी
आणि निष्पर्ण ऋतूंच्या यातनांनी
पिंगा घातलेला माझ्या रानमनी

●

मीही ओठावर माळली असती सुगंधी भरती
हरवलो असतो ताऱ्यांच्या मनात पुनवपणाने
झाडाझाडांवर नाचत ठेवले असते चंद्र
झालो असतो स्वप्नपऱ्यांचे लाडके पंख

●

तू परदेशी पौर्णिमा अंजिरी
आणि गगनाचे जळालेले कुंज माझ्या डोळ्यांत.
मी अनावर मरण या भगभगत्या दिक्कालात
कधी तुझ्याही नभाच्या पापण्यांचे कुंज
मुकाट मुकाट सांडत असतील काळोखात.

●

मला दिसतो धरतीचा मृत्यू
आणि दिसत्या अंतराचे हवेसकट प्रेत
मी फिरतो एकटाच
माझ्या आयुष्याच्या सीमाहीन हिरोशिमातून
शब्द फुटत नाहीत
आत जहरत राहतात रानोमाळ

●

ओठ मिटून किती प्यावी ही दुःखाची झड
डोळ्यांना नाही विराम
" आमुचे डोळे दुःखाचे
ओठ मिटूनी प्यायाचे "

●

माझ्यासाठी तू हे काय ठेवलेस ?
धड जगत चालताही येत नाही निखाऱ्यांच्या झडीतून
ही शब्दशून्य संध्याकाळ. गगनगुंफा जळती
आणि उदास पोरका हंबरडा मी
दाटून उत्कट अवकाशभर

●

चंद्र कलावा थोडा
आकाश त्या कडेवर-व्हावे
पत्रातले नाकेले हस्ताक्षर
परत, पुन्हा परत चुंबून घ्यावे
तिच्या स्पर्शस्मृतींनी परत
खूप खोल खोल विव्हळ व्हावे
पुढे शब्द नको
नि:श्वास नको
शेवटच्या तडफडीसाठी पात्र मोकळे असावे

●

तेव्हा हाकाही रिकाम्याच परतल्या होत्या
पडले होते नजरेचे मढे बेवारस
पिसांच्या पाचोळयांनी भरले होते अंबर
आज एवढेतरी कर
घेता आल्या तर सुखरूप परत घे
आपल्या आठवणी
रानोमाळ होऊ नयेत माझ्या ओसाडीच्या सांगातिणी
मग खुशाल घे दार लावून
शब्दांनीच वाहत आलेली ही तडफड
हरवून जायच्या क्षणी
पाहू नकोस स्मशानकाठाने
निष्पर्ण झाडाची हंबरणारी कहाणी

तो जुळवीत होता अनोख्या उत्सवासाठी पाचोळा
युगभर काळोखातून होड्या काढीत होता
भुकेल्या हातांनी
काढीत होता कंठातील धूळमाती
तेव्हा त्याच्या पावलांना पैंजणांच्या कळ्यांनी
कवटाळले होते.
त्याचे आयुष्य तो तिच्या बाहूभर
नाचत राहू देणार होता
त्याला माळायची होती एक मस्तानी पुनव
तिच्या सुगंध साकार देहभर.
अचानकच बदलले तिचे स्वप्नरंग
अचानकच बदलले हृदय
पुढे देश
आणि त्याचा पाचोळा देशोधडीला लागला.

●

चुरगाळलेल्या दिवसांच्या उकिरड्यावर
शब्दांना गुदमरावे लागले
नक्षत्रांचे सहवास-ठसे पिसे चेतवित राहिले.
इथेच शिरले मरण आयुष्यात
आणि नजरेची ओंजळ फुटून गेली
माझ्या चंद्रांगिनीच्या मावळतीला
बरगड्यांचे तुकडे वेचून
मी सुक्तांचे नित्यव्याकुळ तोरण बांधले
आणि फुलांच्या स्मशानात
फुलपाखरांचे हंबरणे मी शापाप्रमाणे
भोगले.

सुस्तावून पडलेली वेगवती खळखळ
मौन पांघरून लोळणारे थकून किनारे
देठातून गोठलेला विजवंत प्राण
उदास वारे, श्वास करपलेले तारे
जडावलेले फिके बेशुद्ध रान
टिटवीचा काळा शब्द. जहर विव्हळणारा श्वान.
फडफडणारे कावळ्याचे पंख
मला पोटात घेणारे स्मशान
आणि पेटणारी चिता
व्याकुळपणे पेटणारी एक व्याकुळता.

उशाला आता भूतकाळ फडफडतो
आणि मी मला लागलेल्या वणव्यात
पायाखालून निखळलेल्या नक्षत्रांच्या पायघड्या
आणि मी निर्दय निखाऱ्यांच्या पावसात.
आता एक निष्पर्ण पौर्णिमा
अगतिकपणे डोळ्यात गिरगिरते
पंखहीन संवेदन तळमळते
फुलण्याआधीच सुकलेल्या कळ्यात
ही एक अशी सुनी जीवघेणी वाट
तुझ्यावाचून चालतो आहे मी
मृत्यूचा जिवलग सहवास
डोळाभरून आसवांची आरती
उरभर एक जिवघेणा आकांत...

ती जीवनातून ओघळून गेली,
जसा अश्रू गालावरून
जसे श्वास देहामधून

तिच्या आठवणींचे रंग
आता प्रत्येकच पाहुण्या क्षणाला
तिच्या उसाशाची कळा
आता प्रत्येकच फडफडत्या पानाला

आता फक्तच मेघाळून असते आभाळ
काळजास विजा टोचीत राहतात
तेव्हा शब्द साथ देत नाहीत
अश्रूच माझे रडत राहतात.

तू हिरवा चाफा
माझ्या हातात
हात तुझ्या
मी गुलमोहोर
आणि मोहोर
आग लागलेल्या शेतात

●

तू दिलेला हिरवा चाफा
मरणाची फांदी विसरून
हाताच्या फांदीवर
कायम कलम झालेला
आणि सुगंध करीत
माझ्या आयुष्याचा पाठलाग

●

मी खोल घेत हुंगून हिरवा चाफा
तुझ्या दोन्ही हातांच्या नमस्कार पाकळ्यातील
आणि तूच भिनत आयुष्यभर मारणाऱ्या
हळ्याशा विषासारखी
संवेदनांची तटबंदी उद्ध्वस्त करून

●

तुझे नाव
ते तर कुणासारखेही असेल
पण तुझ्यासारखीच तू कोण ?
मेंदूपुढे वणवणायला लावणारा तिठा
आठवणींचा आग लागलेला अजिंठा

●

तू कधी दिसणारही नाहीस पुन्हा
तू असशील जिवंतच
आणि मी—
चाफ्याच्या झाडाखाली मरून अस्ताव्यस्त
एक करशील ?
तुझ्या हसऱ्या डोळ्यांत, शेवटपर्यंत
माझ्या अश्रूचा एक थेंब जळत ठेवशील ?

●

तुझे हात
माझे हात
आणि चौकात
हिरवा चाफा
व्याकुळ सुगंध
तुझ्या डोळ्यांत
माझ्या डोळ्यांत
गुप्त लिपित बंद

●

हिरवा चाफा
माझ्या डोळ्यांच्या यमकांत मेघमल्हार
आयुष्यभर
तू चाफा देत फांदी
आणि दर क्षणी नवा भुकेला जन्म मी
जिंदगीच्या अंतराळभर हेच अभंग चित्र
हिरव्या चाफ्याचे झाड
आयुष्यावर संगीत फांद्यांचा भार

●

हिरव्या चाफ्याची घनदाट जंगले
समग्र पृथ्वी आणि अंतराळभर
मी हातांची जंगले
समग्र पृथ्वी आणि अंतराळभर

●

पृथ्वीच्या आकाराची हिरव्या चाफ्याची फुले
लाख फुले कोटी फुले
—पाकळ्यांना प्रमोशन आणि तुझे ओठ
आणि एकेका पाकळीवर मी
कळत जळत नाचत पारवा हिरवा

●

तू फुललीत हिरवा चाफा
माझ्या रक्तातील गुलाल महोत्सवात
आणि निष्पर्ण व्हायचे विसरून गेलेला
एक हिरवा कल्लोळ
सहाऱ्यावर विष ओकणाऱ्या विषुववृत्तावर

●

तू मोहोरलीस भरून गच्च गगनगुंफा
तूच तू हिरवा हिरवा हिरवा चाफा
मी आयुष्यभर अगणित हातांचा नाचरा व्यथावा
अथवा अनिकेत लाटांचा तगमग—थवा

●

कुठेही गेले तरी वाट हिरव्या चाफ्याखालून
आणि सुगंधाच्या नक्षत्रखुणा
सकाळ दुपार संध्याकाळ
हातात पाकळ्या घालून

●

तू कुठे राहतेस...........
..........मी तुझ्या स्मरणसमाधीत राहतो
तुझे गाव ?...........
...माझे गाव तुझ्या आठवणींच्या ओल्या दुष्काळात
तू काय करतेस ?..........
...........तुझ्या आठवणींशी मग्न मोहरतो.

●

मी थोडा आधी जन्माला आलो
की तू थोडी उशीरा
की कोणत्याही कारणाशिवायच
असा आपल्यामध्ये पावसाळा
चिंब ओला मुका मोरपिसारा

●

तुला गाता येत नसले
तरी केवळच तू थांब पौर्णिमा
माझे डोळे पाहात राहतील आयुष्योआयुष्यी
संगीताच्या अप्रतिमा.

●

मी गेलोच आहे दूर
पण तू जवळून जात नाहीस
आसवांच्या चाफ्यांनी फुलत राहते हे निर्वाताचे झाड
शब्दांच्या आड
हिरवे गार

●

तू कदाचित विसरलीही असशील
हिरवा चाफा
आणि मी विसरलो आहे विसरण्याचे बळ
चाफा परत माझ्या हातात
कदाचित तू मोकळी झालीही असशील
आणि कैदी मी कायम तुझ्या अदृश्य हातात

●

झोळी केली आहे मी माझी विसर्जित
तरी तू दिलास चाफा जेव्हा
मला मिळून गेले सर्वच सगळ्या पल्याडचे
मला मी अंतरलो, तेही ओझे झाले वजा
आणि मी माझ्या ओसाडीचा माझ्यापुरता राजा

●

ठरवलेस तेव्हापासून
मनाच्या अंतराळभर चाफा झाली असशील
युगभर डोंगर–पहाड उल्लंघून क्षणभरात
निष्कर्षांच्या काठाने सुगंधाने पेटत
गुलमोहोरत
हळूहळू पाकळ्या होत गेली असशील
शहारली असशील मनोमन
मोहोरली असशील उन्मन
आणि एका कुसुंबी प्रकाशात
साक्षात समर्पण
आणि चाफा ससंदर्भ सारा पुनवपिसारा

●

तू चाफ्याचे फुलपाखरू
मी तुझिया भवति भिरभिरू
तू नको नको त्या आठवणी
तू हव्या हव्या त्या क्षणोक्षणी

●

तू फूल स्वप्नाचे हिरवे
तू हिरवे हिरवे चांदणे
तू धमन्यांमधले रक्त माझिया हिरवे
मी काळीज त्यावर ओठांनी तू गोंदणे

●

फूल देऊ नये : ( एक )
चाफ्याचे फूल देऊ नये : (दोन)
हिरव्या चाफ्याचे फूल देऊ नये : (तीन)
हिरव्या चाफ्याचे स्वतः फूल देऊ नये : (चार, शेवटचे)

●

तू तिच्यासारखी फार वाटलीस
तिच्याहीपेक्षा
मी तुझ्यामुळे अधिकच मनवनवासी

तिच्याहीपेक्षा
अनिच्छेनेच अंधारात तळलो ओक्साबोक्शी
तिच्याहीपेक्षा

●

हातात चाफा वाफवताना
काळजातच खोवलीस
हिरव्या पाकळ्यांची वीज
आणि ठिबकणारा एकेक रक्तबिंदू
आता तुझ्यासाठी आयुष्यभर आकांत

●

माझे राहिले खुपत
माझ्या गळ्यात चांदणे
आता काळीज-वहीत
मुक्या जखमा गोंदणे

●

कुणालाही देता येणार नाही
ते देण्यापलीकडचे मला देऊन
कोणालाही देता येईल
ते सोबतीला ठेवून तू मोकळी झालीस
आणि माझी नसलेल्या तुझा मी !

हा रस्ता तेव्हा माझ्या उरात होता
शब्द माझ्या रक्तात होते शब्दात रक्त
आणि रक्तातून रस्ता विहरत होता
तो घरात गुणगुणत होता
पेशिपेशीतून पसरत होता
मला विसरत नव्हता
आता मलाच काही सुचत नाही
रस्ताही सुचत नाही
गाडलो गेलो तिथूनच येतील तशी फुले
उधळत राहतो
आता पुढेही सरकता येत नाही
मागेही परतता येत नाही
इथेच हा नको असलेला मुक्काम
उरावर उगवलेला
आणि रस्ता असा मला खात बसलेला

तुटत तुटत आलेली तार
जोडायची तरी काय ?
जपायची तरी काय ?

फाटत फाटत आलेले भाळ
जोडायचे तरी काय ?
जपायचे तरी काय ?

विटत विटत आलेले रंग
सोडायचे तरी काय ?
जपायचे तरी काय ?

जळत निखळत गेलेली उल्का
कुढायचे तरी काय ?
रडायचे तरी काय ?

आश्चर्यदग्ध डोळ्यांनी प्रथम तुला पाहिले
तेव्हाच ताटातुटीच्या निष्कर्षाखातर
डोळ्यात राख गेली
हा असा प्रारंभ शेवटाने सुरू झाला
पुढे फक्त पुराव्यांनी पाठपुरावा केला
एक वन ओलांडले
दुसरे वन ओलांडले
तिसरे वन
चौथे
पाचवे
सहावे
अशी शेकडो वने ओलांडली
आणि ऋतु शेकडोंनी मला ओलांडत गेले
आश्चर्यदग्ध डोळ्यांनी प्रथम तुला पाहिले

तू मृत्यूचे महावाक्य
तू विनाशाचे विवर
माझ्या सर्वनाशाचे सरोवर
मी पांघरून तुझ्या आठवर्णांचे जळते वस्त्र
या प्रदेशातील
दऱ्याखोऱ्यांतील हवेत हृदय पसरतो
तुझे सातासमुद्रापार जाणे
हे असे मृत्यूची प्रस्तावना असणे
एका खेड्यात उगवलेली निर्मळ पहाट
तुझ्या मिठीच्या मध्यरात्री साष्टांग दुपार झाली
आणि सातासमुद्रापार बुडून मेली
आणि हृदयातील कणाकणात कल्पांत
ओंजळीत उभे वाळवंट
मस्तकातील क्षितिजांवर पेटतो कालपसारा
धडधडून कोसळणारे दिशांचे खांब
मी मृत्यूचे महावाक्य
माझ्या विनाशाचे विवर अंताचे सरोवर

हा पदर मेघांचा तुझ्या दिशेवर
पश्चात्तापाच्या पावसात भिजलेले मन
पुसून काढ माझ्या यातनांच्या अंबराने
तुझ्या निष्पर्णतेची कणव
आणि जिवाभोवती तिचा माझ्या पाश
निदान शेवटी थुंकून गेली असतीस
निदान तुच्छतेने दिमाखवले असतेस ओठ
उद्‌ध्वस्त नेत्रगुंफा पाहात गेली असतीस उन्मादत
तर कदाचित तुझ्या नावाने ठायीठायी
तिरस्काराचे कडू ध्वज लावले असते
उत्कटलो असतो जहरत.
काट्यांनी शृंगारली असती कविता
वीजांच्या आसुडांनी तुझ्यावरील राग काढला असता
पण मी मोडलो तुझ्या उन्मळण्याने
बेचिराख झालो तुझ्या राखेने.
तुझ्या हृदयातील भूकंपाने
आणि जातानाही तुझ्या तिरडीवरून जाण्याने.

जखमांची सवय होत नाही क्षितिजांना
रक्तपिसारा फुलवित नाचत उगवत राहतात दिवस.
आयुष्याला पुरातला लाकुड-ओंडका मानता
आले नाही कधीच
तरी आपल्याच हातांनी आपले मोहोर पुरले.
कधी दिशा काळवंडून जायला
मनात रुतलेल्या पावलांचे एखादे दूर जाणेही पुरले
कवेतले आयुष्य वाहून जायला
काळजाच्या चार थेंबांचा पुरही पुरला
शब्दांचे अंतराळ स्मशाणून जायला
एखादे उरी कवटाळलेले फुल हरवल्याची
खंतही पुरली.
कधी बदलत नाहीत झाडे
जमीन बदलली तरी.
असतात त्यांनाही काळिजे ठिबकणारी
झाडे चाळू लागली की कोसळतात पहाड पावलांवर
आणि ऐकवत नाही पावलांचे आक्रंदन
असा गतकाळ विस्तारत राहतो डोळाभर
आणि वर्तमान पेटत शिशिरत राहतो गळाभर.

सकाळपासून
वाऱ्याच्या ओठी नाचली नाही फुलांची भाषा
ओंजळीत दु:खी संदर्भ येत आहेत ढगाळून
सकाळपासून
सकाळपासून
मेंदूच्या अवकाशभर फुलला आहे काळा मोगरा
कोसळणाऱ्या बुरुजाकाठी काळीज भयकंपित झाले आहे
सकाळपासून
सकाळपासून
उगवत आहेत राखेची चक्रिवादळे डोळ्यांच्या स्मशानात इतस्तत:
एक पडके आभाळ शब्दांच्या जायबंदी कुशीत शिरते आहे
सकाळपासून.

माझ्या प्रतीक्षेत भर काळोखात मांडलेले
गंधार्त चंद्र मरणमग्न झाडावर
माझ्या अपेक्षेत तू बांधलेले
चांदणफुलांचे तोरण आसुसलेल्या दारावर
तुझ्या स्वप्नातील माझ्या राजस वाटेवर
तू अंथरून ठेवलेले व्याकुळ डोळ्यांतील भक्तिभार
डोळे लपविले पापण्यातून तरी दिसते
तुझ्या आसवांची सदाफुली.
घुसळून निघणारे उराचे शिल्प
आणि उलट्या काळजाचे अवकाश

थांबवता येत नाही उच्छ्वासाबरोबर ओघळणारे रक्त
सांधता येत नाही भग्न भाळ तेव्हापासून
झाकता येत नाहीत डोळयांची विवरे
समजाविता येत नाही डोळ्यातील पडझडीला
अजून शक्य होत नाही तुला विस्मरून जगणे
खिन्न निष्पर्ण आभाळाला अजून
फुटत नाहीत नवीं नक्षत्र-पाने
बदलविता येत नाही रक्ताचा रंग
बदलविता येत नाहीत रस्त्यावरच्या दिशा
बदलता येत नाहीत आक्रांताने
रक्तात बांधलेली कडेकोट घरे

आता तू जपायला हवीस
तुझ्या मस्तकावर गोंदलेली काळी करालमेंदी
घ्यायलाच हव्यात अंगावर आता
सर्पसमुद्राच्या अनपेक्षित लाटा
असे मानायला हवे की आपले स्वप्न
झोपेतच अकस्मात दिवंगत झाले
समज मी श्रीमंत हिशेबांचा कपटा नव्हतो
आणि फाटून गेलो सहजच.
माझ्या निष्ठांनिच केला माझा उपहास
जगतोच आहे एकेका फांदीशी काडीमोड घेत
समज मी भेटलोच नाही.
तुझ्यावाचून पेटलोच नाही.
तुझ्या पायांना विकत घेणारी रांगोळी
आता उधळून लावू नकोस
माझा संदर्भ सांगणाऱ्या दुःखाला
ओळख देऊ नकोस

मी आयुष्य नि:श्वासांच्या हवाली केले
वनवासी शब्द माझे अनिकेत तगमगले
परत फिरविता येत नाही कधी कधी
कडेलोटाने उधाणलेल्या वेगाला
काही शपथांना नसतात अटींचे पर्याय
काही स्वप्नांना मान्य नसते क्षितिजांतर
नसतात वाटा काही पावलांना परतीच्या
तेव्हाही विस्तवावर निजविले होते मी
माझ्या शब्दांना तुझ्या खातर
आणि तू दिशांतर केलेस
तोडून मिठ्या माझ्या शपथांच्या.
जितके खणावे हृदयाला तितके सरसरून
असे झरे लागतात
किती उपसावे हे अनावरपण जिवातून
हिरमुसलेल्या जखमा भरून भरूनच येतात.

पुढे सदासाठी मेलेली आवडत्या संदर्भांची सोबत
दिशा दर्यांची दारे टाकतात बुजवून
विस्तारतो अंधार त्याहीपुढे सर्वत्र पुढे अंधार
सर्वच गोलार्ध जातात मिटून
निष्पर्ण झाडांजवळील खुणांचे
फोडून गाडून टाकतात निर्मनुष्यता
वाटा पतरतात हात झटकून पावलांपासून
त्याआधीच शब्दही असतात फिरलेले परत सुन्न होऊन

कसे पडावे बाहेर या निर्वात लोखंडी तुरुंगातून
कसे धावत सुटावे आपल्या हृदयाच्या हाकांमागे?
कसे लपावे, कुठे दडवावे
आपल्या रक्ताच्या आदीम भरतीला
कसे वाचवावे तुला मला
इथे बंद वर्तुळातून घेऊन आलेले वादळ
कसे वाचावे आपण
पुढे वाढून ठेवलेल्या दऱ्यांच्या क्रौर्यापासून
कुठे दडवावे आपल्या जुळणीला शापणाऱ्या
सनातन शौर्यापासून
चाकोऱ्यांना मस्तकी घेऊन
मरणाआधीचे मरण वाहात्रे
की बेबंद बुलंद झेप होऊन
मरणाच्या आडोशानेच सुरक्षित व्हावे.

झाडाच्या प्रत्येकच पानाला बाण मारलेले
वाटते
माझ्या काळजाखाली कुणी सुरूंग लावला आहे
डोळ्यांच्या हातातून अलगदच कुणी
क्षितिज उचलले आहे
आता प्रत्येकच क्षणाच्या पावलापुढे
अग्निच्या पायघड्या
खूपच हळवे झाले आहे मन
आपल्याशीच रडत राहते एकटे केविलवाणे

जळता गळा दिला अंधाराच्या हातात
अनाथ क्षितिजे परत फिरलीत मनात
पहिल्यांदाच इतका झालो होतो दीनवाणा
एकाकी रडल्यात चिता शब्दाविणा अश्रूविणा
शब्दातही मी अभंगवू शकलो नाही माझा भंगलेला कणा!

हे रक्त माझ्या अस्तसन्मुखतेत गद्‌गदून फुटतंय
कवटाळून शोकाच्या धबधब्यासारखे माझ्या विभक्त आयुष्याला
कोसळत राहते हे रक्त
आणि दिशा उद्‌ध्वस्त शब्द दिङ्‌मूढ, अवाक्, बधीर
साहत राहतात रक्तप्रपात
उल्कापात.
ऐकत राहतात स्वप्नरुंडांचा वृन्दघोष
आणि चित्कारतात अनाथ
आपल्याच मेघमंडळातून सांडणाऱ्या
हाडे विरघळवणाऱ्या पावसात.
तुरुंगवास पचवित जळतात आणि
हे रक्त माझ्या अस्तसन्मुखतेत गद्‌गदून फुटतंय.
माझ्या आयुष्यातून फुटून निघालेल्या
फाटलेल्या रस्त्यावरचे हे रक्त
माझ्या डोळ्यांतील खिंडारांपाशी
तासन्तास कधी मुकाटच उभे राहते.
कधी नुसतेच ओघळत असते.
कधी पाहतो मी खस्ता मागे निरवून गेलेला रस्ता
कुठून करावा सुरू माग त्याच्या निर्दय लांबीचा
उराशी ओसाडीचे ओझे.
पहिल्या पावलापाशीच मोडून पडतो प्रवास
कुठे गेला निघून असे पायाखालून
पाय वाऱ्यावर टाकून.

माझ्या आसमंताच्या कुडाच्या भिंती
त्याने कुठे ठेवल्या असतील

मला कळू आले तेव्हापासून हरएक गोठ्याचे गोठलेपण
आणि अनोळखीपणा नवनव्याने
ओळखी खुळ्या ठरवू लागला.
परिचयाचे कस्पट—कल्लोळ हलकल्लोळ झाले
हे म्हणजे झाड. तो म्हणजे आड
हे म्हणजे हाड. तो म्हणजे माड
असे पटवून घेताना संज्ञेचे दिवाळे निघाले
झाडांना पाने असतात. फुले असतात
फुलांना सुगंध असतो. हे ऐकताना
काळजाला कापरे भरले
हिंमत मरत गेली
जे जे कळणार होते ते ते अनावर अनाकलनीय
होत गेले
हाकेच्या अंतरावरील स्वप्ने
एका खिंकाळत्या वादळाच्या पायाखाली मरून गेली
सगळे आपले हाकेच्या अंतरावर असावे
आणि अंतर आपल्या ताब्यात नसावे
अशा वातावरणात चालणे पावलांना भाग पडावे
अशी युगंधर हवा
पात्रातून वजा प्रवाहाशी माझे नाते आहे
माझेच नाते आहे
आणि या शोकदग्ध किनाऱ्यांचा मेघमल्हार
माझ्या गळ्यात
माझ्या डोळ्यांतले हे खोदकाम
हा आठवणींचा अजिंठा
ऊन हसायचे. बसायचे
असायचे सोबतीला दुपारभर
सायंकाळी आणि रात्रभर
—आणि आता रक्तच रक्त रस्ताभर

तसा उधळलेला मी हयातभर
आणि माझ्या हाका वेड लागलेल्या
दिशा दिशाभर
आणि ही अस्तसन्मुखता माझ्या रक्तात
कल्लोळ फुटणारी
रस्ता उरात होता, उरात माझ्या
शब्द माझ्या रक्तात होते आणि रस्ता
शब्दात होता. घरात गुणगुणत होता
हृदयाच्या लक्षावधी
खिडक्यांच्या मधून हा रस्ता
माझ्या पेशींमधून पसरत होता
मला विसरत नव्हता
आता मलाच काही सुचत नाही
रस्ताही सुचत नाही
गाडलो गेलोय तिथूनच
उधळीत राहतो फुले
रस्त्यावर पडेतोवर त्यांच्या शक्यतो ठिणग्या होतील
आता पुढेही सरकता येत नाही
मागेही परतता येत नाही
इथेच हा नको असलेला मुक्काम
उरावर लादत राहतो
हा रस्ता असाच खात राहील मला
त्या आधी त्यावर आपली राख पसरता आली तर
कदाचित हा विनाशाचा सोहळा तरी
मनाजोगा सुंदर होऊन जाईल
रस्ता कुठे असल्याचा नसता झाला
त्याचे उत्तरही कदाचित मिळून जाईल...

नंतर मुके झाले रक्त मांस
मृत्यूच्या लीळाचरित्राची पारायणे करताना
निर्दयपणे काळोखाच्या पुरावरून
चालत गेलो—
मागे न पाहता
त्रिकाळाच्या उत्सवात
आणि आभाळ कोसळणाऱ्या खडकावर
मन ठेवून दिले
चेंदामेंदा होऊ देत
निर्विकारपणे
ओघळून जात मी उभा
उभ्या पावसात

●

तेव्हा तुडविले मी माझे काळीज
पायांखाली
पावले होरपळून जाईस्तोवर
तडफड मुठीत आवळून
सुरुंग लावले हातांना
उभ्या झाडांमधून नेले फरफटत जिवाला
जन्म स्मशानात ठेवून दिला
दिशा गरगरून अंधत्व धुंद

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
२५२८
दा. क्र. २०६५६
काव्य
संदर्भ शाखा (स्थळ

दु:ख खात असते शब्दांना आत दिशा ओस ओस असतात
तेव्हा तूच लावतेस दिवा माझ्या डोळ्यात आणि
तुझेच डोळे अनाथ वाहतात.

तू चुंबिलेस ज्यांना, गळा माळ केली ते माझे उदास जळके हात
जाळाया बघतात हे उन्मळलेले आयुष्य आणि तूच मुकी जळतेस अंधारात
टोचून टोचून खातोय काळीज माझे तुझ्या पत्रातील
जीवघेणा चीत्कार

हा जन्म झाला रानोमाळ माझा
आणि विझू विझू तुझे अंतराळ तुझ्यात

चुकलेल्या उत्तरासारखी ही नंतरची वाट
पुसावी वाटते कधी बादळक्षणात

आणि तूच हंबरतेस रडवेली काळोखभर
जसा कल्पांत उभा तुझ्या दूरस्थ सर्वस्वात

लाखदा वाटले फेकून द्यावीत ही पानांची देठं
घ्यावा काडीमोड निरभ्र आठवणींशी
थुंकलेल्या थुंकीभोवती नाचणाऱ्या जिभेला
करावे नृत्यनिवृत्त. ठरवतो खूपदा की
काढून टाकावा काळजातला नाते तोडून गेलेल्या
परक्या झाडाचा काटा. तरी फुटलेला घडा
घेऊन जातोच पुनःपुन्हा मृगजळापाशी
मीही असा की बसतो फाटलेली इच्छा शिवत
फाटलेल्या दुधापाशी.

ओलांडून कक्षा परत परत होतो क्षितिज तुझ्या चाहुलीसाठी
परत परत लावतो कान नाडीबंद वाटेला
फुलवितो आसवांनी डोळ्यांतले वनवासी निष्पर्ण
कवचकुंडलांसाठी दर मृत्यूने व्याकुळत राहतो मनातला कर्ण

ओततो सागरामागून सागर
वणव्यांनी कवटाळलेल्या काळजावर
समजावतो डोळ्यांतील चिरफळ्यांना
पालवीसाठी आसुसलेल्या खंडित शिल्पांना
पायाखालच्या तप्त आभाळतव्याला
पितो काचा मिसळलेले मरण
थांबत नाहीत दंश आणि
उरभर होणारे निर्णायक स्फोट
थांबत नाही रक्तस्राव जिंदगीचा
मद्यानेही पोळलेले ओठ

आपण संदर्भ उभे करतो आपल्या संदर्भात
आपण उभे करतो आपल्याला
नाना संदर्भांच्या चौकटीत नाराजीने
वा राजीखुशीने आणि गोष्टी ठरत जातात निरर्थक,
अनर्थकारक वा अर्थपूर्ण
जीवनाची साधना होऊन बसते मरणाची
आराधना.
अनपेक्षित स्वप्नांची कामना ठरून जाते चिरवेदना
किंवा असेही घडते कधी कधी की
मरणाच्या सावलीतही फुलतात अष्टदलकमळे
जिंदगीची.
कधी फुलते जीवनच स्मशानात
कधी स्मशानच होते जीवनाचे.
...पाहिलीस सुखद स्वयंवरे तुझ्या इच्छांची
माझ्या भेटीच्या आरशात
नेसत हसत होतीस पौर्णिमा एका खुरट्या बेटावर
करीत होतीस मला गुलाम
गुलामाचे राजेपण सजवण्यासाठी भाळावर
मनाची पडझडही भांबावली या अकल्पितताने
दु:खापेक्षाही बरसलो अंधारून पुढे या सुखाने.

कधी अशा अनपेक्षित सुखांनाही अनिच्छेने
जन्म मोडीत काढणाऱ्या दु:खांसारखे वागावे लागते
काही निर्णय ठरतात निर्णायक
काही घटनांचे जन्म ठरतात प्रस्तावना मरणाच्या
ओढला गेलो तुझ्या अंतरिक्षात जेव्हा
मुक्या ओठांनी गुंफिलास
सुखदु:खांच्या स्वयंवराचा निर्णय
कफनाप्रमाणे लपेटून घेतलेले मला
मृत्यूने बेवारस त्याच्या
कुणाच्या इच्छेने ? कुणाच्या अनिच्छेने ?

पहाटे आधीच झालीस रक्ताची रहिवासी
निर्वासीत स्वप्नाची अधिनायिका
नायिका पहिल्या भरतीची, निर्वात प्रारंभाची

बांधलेस घरटे खडकाळ झाडावर
टेकलीस पौर्णिमा निष्पर्ण खांद्यावर
पाकळीपाकळीने फुलविलेस मुग्धतेचे अंतराळ
घेतल्यास महिरपवून आपल्या ताटव्यांच्या तिजोऱ्या
नव्या अग्नि-तृषेने कणाकणाचे गळे व्याकुळले
तिथपासून....

पुढे अर्थ हरवलेले संदर्भच ओंजळीत आले
आणि जळणारे काळीज
मी ज्वाळांनी शिवले.

जन्मतःच चौकटबंद मी अभावाच्या पार्श्वभूमीत
खुडले चुकार शेंडे पुनःपुन्हा वाताहतींनी
ससेहोलपटीला मान्य नव्हता स्वल्पविराम
तापलेल्या तव्यावर पेरायला मिळत नव्हते.
कोणत्याही क्षितिजाचे बियाणे

घामाच्या पुरात वाहून न जाता पोहायला
शिकवले गरीब आढ्याने
वाऱ्या-पावसाच्या धर्मशाळेत
दु:खांनी गजबजलेल्या सराईत
मी दु:खांची ओळख विसरायला शिकलो
न जगता न मरता असे माझे शैशव करपले

तुझी पहिली भेट मी कोळशांच्या
कडव्यांनी शृंगारली होती
उल्लंघून करवती किनारे
माझ्या जन्मजात विराणात तुझे सुगंध अंथरलेस
दिलेस मला तुझ्या आयुष्याच्या परिकथेचे नायकपण
अवकाशाच्या प्राजक्ताखाली

...तेव्हापासून सगळ्या श्वासांनीच
जगण्यातून मन काढून घेतले
असे जळल्या सातत्याला पुन्हा एकदा
एका नव्या आगीत तू जाळून काढले

गुदमरतो गुदमरतो आज जीव जसे विष अंगभर झाले
जळतात जळतात डोळे जसे मोर वणव्यात सापडलेले
कसे समजावू, कसे समजावू या फेटाळलेल्या प्रार्थनांना
माझा जीवच तुडवीत जातात वेड्या मरणझुलत्या वाटेवर
जातानाही वळून पाहिली नाहीस ही सर्वनाशाची करुण कथा
तडफडली जी तुझ्या नावावर आयुष्य जाळत्या जळत्या रेषेवर
आता क्रियापदे दिसत नाहीत चकवणारी सर्वच दिक्कालातून
मोडून पडलेले उगम पुढे आणि काळीज असे झाले आहे घामाघूम
आता श्वासांमधल्या वाढत्या फटीत टिंबे ठेवतो ओळीने
शक्य तर वाच कधी ही दैनंदिनी, आयुष्याची रखरखीत कात्रणे

तुझ्या सदिच्छांनीही....
सोडविता येत नाहीत प्राणाला पडणारे विषारी विळखे
विझविता येत नाही अशी पेट घेतलेली श्वासांची माळ
तू दिलेल्या दिलाशानेही
सांधता येत नाही अंतरातून तडकत गेलेले आभाळ
शिवता येत नाही धुळधाण झालेले चिंध्या चिंध्या भाळ

आटलेल्या हवेमधून चालताना
कवितेच्या ओळींमधूनही किनारा दिसत नाही
कळत नाही आकाश कुठे ओघळून गेले
राखेचे ढीग तशा पडल्या दिशा दाही
साऱ्या संकेत विभ्रमांना पुरून आलेला
हा निर्णायक प्रहर
आणि डोळ्यांतील अंधारातून कुठेच काही दिसत नाही

गुणगुणता येत नाही आव्हाने ज्यांची
त्या क्षणांची पालखी मला कुठे नेते !
मेंदूची तिरपीटच फक्त बेसुमार...आणि
उरीपोटी जपले त्याची सुन्न संध्याकाळ कुठे जाते ?
कुठवर आले होते बळ सोबत करीत मिळविलेले
दूर मागे दिसतात अंधूक शब्दांचीही कलेवरे
इथून सगळेच मावळलेले, दिसत नाही काही
सारीच वळणे परकी आणि काळोखी भुयारे

नंतर निर्विकार परतला तिथून वारा
विलय पावत गेला समग्र दृश्य पसारा
तिथून शेवटची संपूर्ण अगम्य पडझड

पुढे मावळलेल्या पराधीन घटका
निर्वाणीचा अखंड शिशिर समोर
आणि सभोवती वरखाली साद्यंत अपरिचित
उत्कट, सुन्न काळोखाचा अपर्यायी दरारा
त्याचे सार्वभौम अनंत विवर....

दरेकच अस्तक्षितिजापासून
जात राहिल्या पावलांच्या होड्या तुफानाकडे
क्षमा केली नाही जिंदगीने एवढ्याशाही चुकीबद्दल
दर वळणावर पावलांच्या सगळाच हिशेब वसूल केला
फुरसत मिळाली नाही कधी दु:ख पुसायला
बसून कुरवाळायला
बसत गेले घावामागून घाव
उसंत नाही मिळाली कधी हृदयाची आसवे पुसायला
अंगावरच येत राहिला डाव

या ओसाड रात्रींचा मी कोण होतो
डोळ्यामधून ओसंडत होता कल्पांत
आणि माझ्या दु:खाला त्यांनी दुखविले नाही
आत्मघात केला होता स्वप्ने पाहणाऱ्या इंद्रियांनी
आधीच परके डोक्यावरील आभाळ
वारा दूर उधळून लावीत होता
आणि त्यांनी मला उपहासून झिडकारले नाही
वणवणत होता मेंदूतील सुगंध निर्वासित
मृत्यूच्या परिक्रमेला झोंबू पाहात होते
ताठरलेले बाहू
आणि त्यांनी मला शून्यातिरेकात ढकलून दिले नाही
ह्या ओसाड रात्रींचा मी कोण होतो... !

एका प्रलयापोटी जन्मलेली ही कहाणी
निरभ्र नकाराभोवती नाचणारी नग्न विराणी
उत्सवी मृत्यूची मुखजबानी

हे निखारे चांदण्याच्या हातातून सांडलेले
हसत हसत एक तरंगाचे मावळणे
अंधअंगाराशी भांडलेले

हे निःश्वास ढाळलेले आटलेल्या पात्रांनी
हे अश्रू कवटाळलेले डोळे हरवलेल्या पाखरांनी

काळोखाच्या पुरावरी वसविले गात्रा
ग्रहणात कांगावा काय करू

पिऊनिया वारा खाऊनिया पाला
खिसाने दुष्काळा केले आम्ही

कोमेजाया नव्हो कुंडीतील गीत
शिजलो भट्टीत गुलामीच्या

नव्होत समया फुंकीने विझाया
वणव्यात नावा झालो आम्ही

निखाऱ्याचे शेत व्हावे माझे मन
पोचावे धरण गावोगावी
पुन:पुन्हा झालो ध्वस्त हिरोशिमा
मी न मानी सीमा सत्याची ही
भाल्यांच्या टोकांशी केला नित्य वाद
हसरा संवाद जखमांशी
येथोनी उराला बांधोनी वणवा
ज्वाळांनी विसावा भोगेन मी

झालो मी येथल्या नंग्यांचा सांगाती
स्मशानाच्या भिंती फोडिल्या म्या

पुढले वाळवंट फेकोनिया मागे
गातो पिकासंगे नाचतो मी

पसरले बाहू कोस कोस पुढे
चांदण्यांची झाडे आलिंगीती

घेइना मी हाती मरणाचा टाळ
समर्पिना भाळ कदापिही

वादळावरती होऊनीया स्वार
श्वासांचे वावर पेरितो मी

चिता करोनी आयुष्याची उजळियली वाट
पुन:पुन्हा जाह्ली नव्याने विषाचीच भेट

भवती वारा शापित होता अपंग जखमांना
रांधुनिया आतडी दिले मी जेवण अश्रूंना

स्वप्न खोदता डोळ्यांमध्ये कळवळली छिन्नी
तळला गेलो शब्दांसह दु:खांच्या मध्यान्ही

श्वासांचे खोदले अग्निच्या पहाडात लेणे
सोडियले अन् दिशेस उलट्या पुरामधे जगणे

मी येतो तेव्हा तुमची
मैफिल मारते चेहरा
हिरमुसते मदिरा आणि
चंद्रही हो गोरामोरा

मी येतो तेव्हा तुमच्या
मोडले घराचे आढे
गोंधळती पाढे आणि
फाटती टराटर शिडे

मी येतो तेव्हा तुमची
शरमिंदी होते कविता
वाचणे थांबते तुमचे
अन् समुद्र होतो रिता

मी येतो तेव्हा तुमच्या
तोंडाचे पळते पाणी
नभ डोळ्यांमधले तुमच्या
जीव देते हैराणूनी.

हा अजूनही न उगवलेल्या वर्षाचा पहिला दिवस
पापणीत पावसाची सर
जसा नाचावा पिसारून मोर
आणि सूर्य चांदण्याच्या
माळा गळ्यात घालून उगवलेला माझ्या
रक्तक्षितिजावर
मी गात आहे गाणे
आतड्यांच्या स्वरांनी
आणि पाहतो गंध ठिबकणाऱ्या डोळ्यांनी
तुरुंगांच्या भिंती जळून गेलेल्या
मी वेचून घेतो माझी जळालेली त्वचा
मी गळ्यात गोळा करतो विखुरलेली वाचा.
आता माझ्या पेशींची पेशकश
विश्वघटनेशी झुंजत मी उभारीत जातो.
माझ्या रक्तभिंगावाचून मला दिसत नाही
दुनियेचे दिवाणखाने
तिच्यातील मयखाने, पायखाने
मला घेतो तपासून
बेचिराख प्रवास, त्यातील सहवास
विजनवास, दुस्वास
त्यात कोसळलेल्या विजा
हातचे सर्व झालेले वजा
एका घाण्याशी बांधलेले माझे संवेदनविश्व
परवापर्यंतही मी लावले गळ्याशी
विजांच्या विजारीत कसे
थंडी उन्हाशी मुकाबले केले

त्याचीही आठवण ओठांच्या पंगतीला वाढतो मी
आणि एका तळघराशी बांधलेले नाते
अधिक सक्षम करून घेतो
मला तिथूनही माझ्यापर्यंत
सूर्य ओलांडून यावे लागले माझ्यातल्या अंधारात
हा अंधार दावेदार.
या अंधाराच्या साम्राज्यावर सूर्य उगवत नसतो कधी
तिथे माझ्या स्वप्नांच्या स्मशानलीळा
मी जुळवीत असतो
तिथे मी राहतो दुःखाच्या मुखात
घासासारखा
आता मी कुरवाळतो माझ्यावर कोसळलेली आभाळे
तेव्हा शब्द कदाचित दगाफटका करतात.
तरीही मी स्वतःच्याच काळजावर
ही विषाची धार ओतीत राहतो
पायाखालच्या वाळवंटालाही ऐकणार नाही
गळ्याची गळती
तेव्हा जिंदगीचे आभार मानायचे विसरून गेलो तर
समजून चलावे की मला वाईट वाटलेले आहे.
मी माझ्या ओहोटी संपल्यानंतरच्या वाळूवर
दोन आसवेही ढाळू शकणार नाही.
पण तरी खात्री बाळगावी की मला त्याचे
वाईट वाटलेले असेल.
किती सुंदर असते जिंदगी
पण जन्मापासून वणव्याचे
समारंभच साजरे होताना पाहिले
सुंदर असतात वणव्यांचे समारंभ
तरी आभार जुळवताना
जिभेवरून शब्दाऐवजी राखच बाहेर आली
तर कशी समजूत घालायची या राखेची ?
कशी ?

शेण खाऊनी नीती उजागर
बगळा मिरवतो मोराचे पाय....
अरे बाबा कशाचे काय आन् कशाचे काय...!

सत्ता आणिक वैभव ज्यांचे
तीर्थच त्यांचे ठरती पाय...
आरे बाबा कशाचे काय आन् कशाचे काय...!

मुखमें राम आणि बगलमें छुरी
हाच येथला हलकट न्याय....
आरे बाबा कशाचे काय आन् कशाचे काय...!

मानवता बंधुता समता
सर्वांची प्रभू एकच माय...
आरे बाबा कशाचे काय आन् कशाचे काय....!

कुठे रक्त अन् राख कुठेतरी
मुकाट सगळेच निभून जाय...
आरे बाबा कशाचे काय आन् कशाचे काय....!

कुंपण खाई शेत (भुकेले)
अपराधी पण ठरते गाय...
आरे बाबा कशाचे काय आन् कशाचे काय...!

ईश्वर तोवर दैव पुरोहित
तोवर क्रांती होईल काय....
आरे बाबा कशाचे काय आन् कशाचे काय...

सत्य मागते निदान वारा
असत्य इथले लोणी खाय...
आरे बाबा कशाचे काय आन् कशाचे काय....!

छोडो यारो फिजुलकी बातें
गरिबांचे इथे आहेच काय....
आरे बाबा कशाचे काय आन् कशाचे काय...!

ही एक लहानपणाची गोष्ट—
एका बाईच्या रक्तात तिचेच पातळ भिजवून
देवदेवळांसाठी त्यांनी त्यांचे झेंडे केले
तेव्हा मनातील सर्व देवदेवळांना
निर्णायक आग लागली

गवईभावांचे त्यांनी डोळे काढले;
मला त्यातले भावार्थ, यथार्थ दोन्ही कळेनात.
पण काढलेले डोळेच एकदा म्हणाले :

आम्हाला काढले
पण येथे ते कोणाला दिसले नाही.
हा देशच आंधळा
याचेही डोळे जन्मतःच कुणी काढून घेतले
असावेत.

तेव्हा माझ्या डोळ्यांत कोटी सूर्य
प्रकाशात असल्याचा विराट साक्षात्कार झाला.

आकाश फिरले एकाएकी फाटत गेल्या रेषा
गंजून गेले काळीज पुढे थिजून गेली भाषा

जिवापाशी दिवा हवा म्हणून स्वप्न पेटत ठेवले
उरात जखम जपून ठेवली शब्दांचेही ओठ शिवले
खचून पडल्या दरडीखाली मरणासोबत लिहिली गाणी
आयुष्याला बिलगलेली अनोळखीशी नग्न ग्लानी

माथी आग हाती आग पायाखाली आगच आग
गावामध्ये जंगल शिरले काढीत फणफण माझा माग
आठवणीही रित्या मुक्या क्षितिज नाही हाती
पुरामध्ये रस्ता मेला जळून मेल्या वाती

मध्येच प्रवास पुढ्यात वेढ्यात डोळा माझा बुडत आहे
कुठली चूक कळत नाही मला घेऊन उडत आहे....

हे कर्कवृत्त. हे मकरवृत्त.
हे आवृत्त. हे अनावृत्त.
इथे मी असावे काय ?

मी चालतो. ठेचाळतो. वाचाळतो.
चवताळतो. डुचमळतो. कधी चळतो.
हे माझे प्रखरणे,
हे माझे मखरणे,
हे आसवे ढाळीत आठवणी उखरणे,
श्वासाभोवतीच्या भिंती पोखरणे,
हेच परत परत.
एकच घास दोनदा खाणे : अभिनयाचे बळी ठरणे.
इथे रंग काय–बेरंग काय ?
फुटणे काय–प्रस्फुटणे काय ?
हे वारणातीर, हे गिरणातीर
या एखाद्या तीरावरही जाऊन बसणे अशक्यप्राय.
उन्मनीचे पोकळ वासे
उन्मन व्हाया मन मनासारखे असावे.
हे मनही मृन्मन झालेले.
आणि कुठले वेड पांघरल्याशिवाय वेड्यासारखे
गाता येत नाही.
ही वेडे तयार. वेडे तयार
दुकाने तयार. रकाने तयार
झोकाने सगळी मकाने तयार
प्रत्येक क्षण मनासारखी घडी करून
जिभेवर ठेवल्याचे गृहीत धरावे.
प्रत्येक श्वास योजनेप्रमाणे टाळ्या घेऊन गेला

याचे समाधान मानावे
गृहीत धरावे मनासारखे घडले.
गृहीत धरावे जे घडले नसते तेही घडले.
गृहीत धरून गृही परतावे.
हातात येईल तेवढी हवा उत्सवून टाकावी.
...त्याचा हेवा वाटतो
पण त्याचे मठ्ठ ठेंगूपण सुया टोचते
आणि हेव्याची हवा बरबाद होते.
तो त्या भ्रमपीठ परिसराबाहेर गेला नाही.
त्याने किल्ला केला पण पल्ला सोडला नाही.
त्या तीराने तार करून त्याला बोलाविले,
जागा दिली.
पण तो पाण्यात पुरेसा उतरलाच नव्हता.
त्यामुळे नाकातोंडात पाणी गेल्यानंतरची कविता
त्याला लिहिता आली नाही.
आणि तो उत्सवांनी उसवला. निसवला.
माझे मरणतीरावर करपलेल्याचे
गिरणातीर कोणते ?
माझे गाणे काय ? बुजगावणे काय ?
माझे काय—कशासाठी काय ?
येणेही येऊ नये, जाणेही येऊ नये
याचे अन्वयार्थ काय ?
याचे सुख काय—दुःख काय ?
मी निखळपणे निखळून जातो
संप न करता संपून जातो
मी तक्रार नाही. आरोप नाही.
कोणतीही कृतज्ञता नाही. स्पष्टास्पष्ट स्पष्टीकरण नाही
कुठलाही संदर्भ देत नाही ग्वाही.
आणि एक कायम स्फोट
पायापासून मेंदूपर्यंतच्या क्षेत्रनिष्फळात.

हे कर्कवृत्तपत्र. हे मकरवृत्तपत्र
हे आवृत्तपत्र. हे अनावृत्तपत्र
यांत काय ?
काय म्हणून काय ?
मी इथे असावे काय ?
असावे काय ?

तासापूर्वी पिलांसोबत रुखीसुखी भाकर खाणाऱ्या
वठलेल्या बापाला कुऱ्हाडीने तोडले जात आहे
कुठेतरी निर्मनुष्य वळणावर
एका ओल्या दु:खाचा निरोप घेणारा डोळा
मघापासून लवतो आहे
रक्ताने भिजलेली हवा
माझ्याभोवती चिवचिव भिरभिरत
आणि अर्ध्या हाकेवरी उतरलासा वाटतो
कुणा आडे मोडलेल्या आईचा हंबरडा
आजुबाजूला भविष्य धडपडलेल्या पाखरांचा चीत्कार
...उर फुटल्यासारखा पाऊस एका वाळवंटाच्या
दिशेने धावत आहे. या सुन्नतेत कुणी त्याच्या
शेवटच्या हाका उरात पेरून घेतल्या असतील काय ?
तसे झाले तर अंधारात पडणाऱ्या क्षितिजाच्या
डोक्यांसाठी त्यांची कफने होतील.

●

एका यातनेची प्रस्तावना फाडून
त्याने दुसरे आभाळ टेबलावर घेतले
उजवीकडच्या समुद्राची दौत डावीकडे ठेवली.
बुंध्याच्या नवोदित फांद्यांवर बहिष्कार
उन्हाच्या पायघड्यावरून जाणाऱ्या काळजांनी त्यांच्या
हृदयासाठी निरोपांची एक पेटी ठेवलेली
हवेला आग लावीत चाललेल्या हातांनी हे पाहिले
तर—
निरोपाचे लेखन करताना त्याला वाटले
—या अभ्रकाच्या वस्तीत भडका उडेल

घशात अंधार पडू लागला
तसे त्याने विषारी बाण काढून टाकले घशातले
आणि भूकंप पेरण्यासाठी
योग्य जागांची निवड करण्यात गुंतला.

हवा निष्प्राणून आणि वांझ ढगांच्या
रांगांवरून घरंगळणारे डोळे
पालवी प्रारंभापासून रक्ताच्या शेकोटीजवळ
रात्र निद्रानाशजडीत
आणि शब्दांचा हात सुटून स्थित्यंतर बाजारात बेपत्ता
जगणे अंथरुणाला खिळलेले
आणि विवरात विझत विजांचे केवळ मुकाट रडणे
लिंगा-अंगांची घराघरात विखुरलेली विराट सभा
सुभा एका कागदाच्या मरणाखातर तितरबितर
इथे खाल्लेले शब्द जिवंतच ओकायला लागलेली शाई
तिकडे कोंडवाड्यात भाकड गाई
क्रमाने पुढ्यातील पहाड फुगत फुगा
मधूनच किलच्याकिलच्यांनी रडणाऱ्या वाळवंटाचे काय ?
एक शहाणा सब्बलीने विरलेली स्वप्ने शिवत
आणि लाज झाकताना अपुरे पडलेले निष्पर्ण हात
हवा रात्र जंगल लिंग अंग सभा मरण शाई
गाई फुगा वाळवंट विरले स्वप्न सब्बल
लाज निष्पर्ण हात आणि मी
अनेकदा अनेकदा अनेकदा अनेकदा अनेकदा अनेकदा मी
दिसल्या चौकाचे चारही क मरणाच्या तोंडात
मरायचीही ताकद न उरलेली उरात
मेंदूवर घुणघुणा न वाजणारा निरंतर घण
अकराही दिशांची इच्छा चार हताश रेषांचा पिच्छा
कमरेचे डोक्याला बांधलेल्या
इतिहासाचे हासणे
सूपभर शब्द आणि गावभर जात्यांची इच्छा

त्राण नसताना बेभान भात्याची विग-वल्गना
जलवस्त्या आटलेल्या आणि पाण्याच्या आठवणीवर
आठवणींवर आठवणी
आयुष्य वाहून जात्रे असा लाजेला पूर
चौक क मरण घण इच्छा इतिहास शब्द जाते भात विग जल वस्त्या आठवणी
आयुष्यलाज आणि मी
अनेकदा अनेकदा अनेकदा अनेकदा अनेकदा अनेकदा मी

आणखी वेगळाच काळोख
नव्या प्रकाशपिलांना हळूहळू गिळू लागला आहे
आणि वादळाच्या दारात दिव्यांचा थवा तर
मी लावून ठेवलेला आहे.

दुःख आभाळ कोसळून पडत नाही
याचेच आयुष्याखाली सुरुंग होते
आणि कधीच फाटत नाही म्हणून
या मातीच्या हृदयाची शंका येत राहते
तरी या अंधारातून येणाऱ्या लहरींमुळे
माझ्या डोळ्यांतील आटलेला सागर उचंबळतो
वन तसा कार्यक्रमाने प्रश्नांचा परिसर धगधगतो.
नुस्ताच आवाजांचा काफिला
मी सहजच दुर्लक्षिला असता
पण निग्रहांचा थवाच्या थवा
मला इमान मानायला भाग पाडतो
सगळ्या सज्ज शक्यतांच्या
स्वागतासाठी एक महाद्वार
आणि अपूर्व सोहळ्याची सोय
रक्तप्रदेशात मंडपून ठेवली आहेच.
पण त्याहून अशक्यतांचा अभ्यास
सतत करणारा सदोष स्वभावही
वैभव म्हणून मी जपलेला आहे.
फक्त किनाऱ्यांचे सांगाडे
गळ्यात घालून समुद्रशोध मी घेत निघालो आहे
आणि भरतीच्या भावनेने नाचू
अंगभर उधाणले आहे
आणि सोबतच बेचैनीही उधाणून आली आहे.
....आणखी वेगळाच काळोख
नव्या प्रकाशपिलांना हळूहळू गिळू लागला आहे.

चोराला भेटतो मलिदा म्हणून चोरी करू नको
जबर लागते किंमत म्हणूनी डोके आपुले विकू नको
दरिद्र तुझे महाभयानक, बोल नशिबा लावू नको
उमजून घे सैतानी कावा कुत्र्यावाणी मरू नको—
लाख पिंजरे तुझियासाठी सावध बापा अडकू नको
चढाओढ ही भूलथापांची शहाणा हो तू फसू नको
ज्यांनी ठेवले तुला अडाणी त्यांच्या नादी लागू नको
तुझ्या फाटक्या आयुष्याला संचित म्हणूनी मिरवू नको
तुला लुटाया दलाल भवती छाट मुंडकी डरू नको
हात तुझे तलवार होऊ दे वेळ फुका तू दवडू नको
मेल्यावाणी जगशील कुठवर कुढत घरामधी पडू नको
समय घालतो हाक तुला, ये बाहेर नर्की सडू नको
देवाची दैवाची दारू पिऊन वेडया झिंगू नको
लाथ मार त्या घातक सोंगा बेडयांचे गुण गाऊ नको
घरे पेटती तुझी सदोदीत पेटून ऊठ तू विझू नको
कितिक तुझ्या बहिणी नासवल्या जागा हो तू निजू नको
जाईल अंती काय तुझे तू या युद्धाला भिऊ नको
आग मारते हाक तुला ये, पुढे आसवे गाळू नको
पंथ, पक्ष अन् जाती गटांचे जहर यापुढे खाऊ नको
एक एकटे बेट शत्रूच्या हाती देऊन मिटू नको
लाख पाजतील तुला छाकटे तसली दारू पिऊ नको
पूर्वज मेले ज्या मौतीने तसाच तूही जाऊ नको
विवेक वागव उरात आता धुक्यात मागील शिरू नको
उजेड घेऊनी उजेड हो तू अंधारातून फिरू नको

आपलेच काळीज खात राहावे
पीत राहावे आसू पोटभर
नाहीतरी भूक पचवितच आहेस
आता मरणही पचवायला शिकावे घोटघोटभर
रिकामा माठ वाजविण्यात सुख शोधावे
नाहीतरी तुझ्या गीतांची होळी झालीच आहे
आणि संगीताचे निघालेच आहे दिवाळे
तू ज्याला चंद्र म्हटले होतेस
त्याने नाव बदलून घेतले
तुला पाहताच,
क्षितिजही बदलून घेतले, तू क्षितिजावर दिसताच.
पण बदलायचे विसरूनच गेला आहेस तू जळालेले घर
आता मरणही पचवायला शिकावे घोटघोटभर

●

पाहतो आहेसच तू
आता मोसमही राजरोस धंदेवाईक झाले आहेत
आणि ज्वाळेवर डोळे रोखून तू कधीचा उभा आहेस
नवनवी माणसे येतात प्रत्यही या वाटांवर
आणि तू मेलेली वाट सोडायचे विसरूनच गेला आहेस
आपले सांडणारे रक्त फ्रेम करून ठेवावे
पहात जावे.
त्यामुळे परत परत आठवणी येत नाहीत
आणि इथे पेरू नये स्वत:ला
उपटून फेकले जाणारच नाही याची खात्री नाही

●

असे काठाकाठाने फिरत रहावे
आपल्याच हाताच्या मिठीतून प्रवास करावा

घशात घुसेल ते विष गोड करून घेत जावे
वाटेल ते खाऊ नये, वाटेल ते पिऊ नये.
वाटेल त्या दु:खाशी दोस्ती करीत रहावे.
शांत निर्विकार असेच जळत कोसळंत रहावे पोटभर
आता मरणही पचवायला शिकावे घोटघोटभर

चिखलात उगवलो आणि अंगात चिखल नाही
माती

आणि

पाणी
यांना वेगवेगळी राष्ट्रे द्यावीत
त्यांना वेगवेगळी राष्ट्रगीते मंजूर करून टाकावीत
पाण्यात भिजलो आणि मातीने रुजवायचे नाकारले
मातीने माखलो आणि पाण्याने धुण्याचे नाकारले
संवेदना उन्ह झाली आणि
फाटलेले उन्ह शिवताना
माझे ग्रहगोलांकित अंतराळ समग्र फाटून हातात आले
कवाडे बंद करून घेणाऱ्या रस्त्यांच्या गर्दीत
माझ्या जिभेचे निधन पाहण्यासाठी ,
मी डोळे मिटून आतूर
एक जीवापाड करीन :
ठिणग्या धारेला लागू देणार नाही
माझ्या बदनाम मस्तीने स्वतःला दंशून घेत राहीन
नाही म्हटले तरी बातम्यांचे बाण येणार
बाण येणार
आणि कवचकुंडलास पारखा मी एकटाच
अग्न्युत्सवासाठी पहारा देतो आहे सहारा
जळतो आहे कणांचा मुकाट पिसारा—पसारा
येणाऱ्या प्रत्येक क्षणासाठी ठेवली आहे कबर
आणि आल्याच तर
सतत धगधगत आहेत आठवणींसाठी सरणे
त्यांचे एक ठीक आहे

ते कुणालाही देवबाप्पा म्हणतात. बाप म्हणतात.
भक्तिपूर्वक मायची अब्रु घालवितात.
....साला इथे सगळे अरर्थक होऊन पडले आहे
प्रत्येक क्षण म्हणजे भूकंपाने घेतलेला चावा
मृत्यूची एकेक जालीम् आकृती
आणि बातम्याचे बाण
बाण

मान वळवून पाहात ढगांची लालसा
गवताच्या डोंगराचे ओठ पिंजारणे आणि ज्वाळांचा स्फोट
आकाशातील इंद्रधनुष्याला भेग आरपार
आभाळावर अक्षरे झाडलेली खंगून दक्षिणोत्तर रेघ
सूर्यकिरणे सगळी शेतात धरून
तयार तासात देताना पेरून
एकदम दाहि दिशांत गिरक्यांचे वादळ
वाऱ्याच्या पायात बांधता न आलेल्या पैंजणांचे
झाडाझाडाजवळ आसवांचे निरोप
प्रस्तावनेलाच पेटून निघत असेल प्रवास
तर प्रारंभ शेवटी यावा प्रवासाच्या
म्हणजे घट्ट दाबून धरलेल्या
ओठामागील तडफडणारे रक्त
सोबत वागवता येईल ससेहोलपटभर
आधीच पाठ फिरवून बसलेली मातीची ममता
चार क्षणांची शून्यता अखंड
गर्दी करून गवत दिवसभर उगवत
काळजीने पोखरलेले चार डोंगर मिळून चौरंग
आणि नदी रिचवणारी तुरुंगात
एकेक नक्षत्र कुठल्याही वेळी चाललेले गळून
आणि निःश्वासांचा पाऊस घराभोवताल अनंत
मध्येच छाती फुटून पडलेला रस्ता
उजवीला त्याच्या गाण्याच्या फासळ्या
डावीला सुकलेल्या रक्तात स्वप्नांच्या मासळ्या....

●

जीव मुठीत बांधून लपविण्यासाठी

पहाड शोधणारी भयभीतता
वेशीपर्यंत मारेकऱ्यांची अमानुषता थडकलेली
भोवताल पायांनी हात टेकावे अशी नग्न निरुपायता
रस्ते चुरगाळून खिशात लपवलेले
कालवर काळोखाने हाका खाल्ल्या
आज काठोकाठ भरलेला मदिरेचा समुद्र
मुळासकट एकुलती जिभ उपटून मागतो
कालवर सरणात यशस्वी जळालेल्या लाकडांनी
यापुढच्याही सर्व सरणात जळावे या वटहुकुमाने
माझे डोळेच खणून नेले आहेत
आधीच मला आलेल्या पुराने मी वाहून जाईन म्हणून
घशात पूर बांधून उभा आहे
आणि जोडीने नागडा पाऊस वेड लागून
अशा वेळी स्वतःच्याच स्मशानात स्वतःला मी पुरून घेत.

●

कुऱ्हाडीच्या हातांनी ज्वाळांच्या दातांनी
मरण त्याच्यावर तुटून पडलेले सूडाने
त्याच्या रक्ताच्या बातम्या मेघांपर्यंत जाईस्तोवर
त्याने कवटाळले होते उराशी एक स्वप्न शेवटपर्यंत
धमन्यांतील पालवीची शेवटची थडथड थांबेपर्यंत
डोळ्यांत खोदलेले नागवे शिल्प
त्याने निखळू दिले नव्हते
शेवटी शेवटच्या श्वासाचे नाते जळून जाताना
त्याने पाहिले
सूर्य उत्तरेला मावळतो आहे आणि
दक्षिणेला सूर्याईचे बाळंतपण.

जेयाचे आयु उदंड
ऐसा एकु सैतानु आथि ।
तेयाचि पोरे अपारू ।
तेयातील चमच्यावरू तेयाचा अपारू जिवू ।
तेयाना तो आपुले म्हणे । कवटाळी । हार्द दे ।
एर अन्नाविणा गांजिती । घराविण राहती ।
तेयाते कोणी पुसेना । जवळी घेईना ।
कोणी मारिले मरिती । जाळिले जळिती ।
तेयांचे आसू पुसिता कोणी नाही ।
तेयांचा कैवार घे ऐसा कोन्ही नाही ।
डोईवर नभ नाही ।
चालतेया पायातळी भुई नाही ।
तिये सदुर्बळु । नावडतिये ।
वारा पिऊनी जियेती ।
दु:खे खाऊनी राहती ।
केंव्हेळी कष्टाचिये पहाडातळी पिचत असेती ।
सैतानु पहुडु स्वीकारिला असे ।
तेयाचिये चमचे पोरे तेयाते स्तोत्रे गाती ।
तेयाचि लीलाचरित्रे रचिती । सैतानु तृप्त मरव '
ऐसी सहस्रे निघौनि गेली ।
सैतानु पहुडु स्वीकारिलाचि असे ।
तेयाचि चमचे पोरे तेयाते अंगाई गाती ।
सैतानु माय । सैतानु बापू म्हणती ।
आनंदे नाचति ।
येरांना गांजिती :
सैतानु पहुडुची स्वीकरीला असे :

एकू दी अवघी सदुर्बळू पोरे त्रस्त जाहली ।
जळिली : पोळिली : म्हणो लागली :
हा गा : हा कैसा बापू गा :
हा तो सैतानु असे : हा तो जन्मवैरी :
हा तो सॉलिड्डु दुर्दैवू की गा :
आमुचा बापु नव्हे : माय नव्हे :
म्हणौनि तेयाते निखंदू लागली :
आपुलाले अनाथ सांगू लागली :
तेयांचा साक्षात्कारू ऐसा :
तेयाते बापूचि नसे :

आता सांगावे तरी काय, ऐकावे तरी काय !
ही भयकथा तर आपल्याच दातांची
आणि आपल्याच ओठांची झाली.
पण तरी दातांनी जरा डोके ठिकाणावर ठेवून
वागायला हवे.
काळोख म्हणजे परम नव्हे
नव्हे द्वेषही चिरंतन
माध्यान्हीच्या सूर्यावर थुंकणाऱ्याने
थुंकी आपल्याच तोंडावर पडणार नाही
याची काळजी वाहून नसतो उपयोग
उंचावरच्या द्राक्षांना कोल्ह्याने हिणवण्यात अर्थ काय ?
आता सांगावे तरी काय, ऐकावे तरी काय !

●

त्यांना माहीत आहे त्यांचे मातीचे ' देऊळ '
आणि देवळाचा पत्ता विचारत निघालेला महापूर
तरी थंड पडत चाललेल्या कारस्थानांना
ऊब यावी म्हणून
चंद्र चांदण्याच्या शेकोट्या ते पेटवीत असतात.
क्रांतीचे बी-बियाणे पेरण्याऐवजी त्यांनी असूया
पेरली
डोक्याऐवजी ते पायांनीच चालत राहिले.
कशी समजावी त्यांना भाषेवरील जबाबदारीची
जबाबदारीची ओझी
सत्य बोलता येत नसले तरी
टाळणेही जमत नाही
तरी असत्याने सत्यावर असे भुंकावेच काय ?

आता सांगावे तरी काय, ऐकावे तरी काय !

●

कधी जळायला लागते मन
आणि कितीही विझविले तरी विझत नाही
ओंजळ पुन:पुन्हा रक्ताने भरून येते
हातांचे ओझे होते आणि ओझेही सुटत नाही.
काय काय सांभाळावे कधी निष्ठेखातर
मनाची तडफड थकतच नाही. मरतही नाही
शब्द कधी भरून येतात कधी मारून येतात.
तरी युद्धाकडे पाठ फिरवणे साधत नाही.
तरी आपल्याच डोळ्यांचे पंख मोडून पडतात
तेव्हा करावे काय ?
सांगावे तरी काय, ऐकावे तरी काय !

त्या वाड्याकाठून रस्ते खाणारी झाडे
डोंगरांच्या तोंडांना ओरबाडणारी मांजरराने
स्टोव्ह भडकून पेटलेले आभाळ
आणि ठिणग्यांनी चिमुटभर उकिरडा धरती
सुईच्या नेढ्याच्या महाद्वारातून जाणार नाही
अशी दिंडी कुठे ?
असा खात्रीचा मळ अंगावर थराथरांनी
दोन बोटांच्या चिमटीत पहाड
आणि बऱ्याच लहान थेंबायेवढा समुद्रानुभव
सुईच्या अग्रावर झोपवून सोडले
मूगदाणा ते पृथ्वी, सूर्य ते शनी
डोक्यातील औषधी वनस्पती जपत
संकटाच्या वस्तीतून प्रवास
काळीज पेटवून प्रवासाची प्रस्तावना
आणि डुकत गेलेले मध्यांतर
आसवात रक्त मिसळून पितापिता
शेवटी मृत्यूचा थेंब उरलेला
आणि माझ्या आयुष्याची विडी फुंकत विराण वनमाला

मागल्या अंधाऱ्या दारातील उकिरड्यावर
फोफावलेले गोमटे गवत
विळे-कोयतेवाला कुणीही कापून नेऊ शकेल कचाकच
आपल्या खिशातील म्हशीसाठी
मिरासगिरांच्या परिसरात पिसारतोय सवयीने मोर
भूतबनात नाचत ठेवतो तो पाय
आणि पिसाऱ्यावरील डोळ्यांनी फिरतो तो वर्तमानात
नेणत्या नजरा गुंडाळीत.
एका बाजूने विरून गेलेले आहेत झाडांचे कपडे
दुसऱ्या बाजूने पोपट–वाणीतील
स्पष्टत आहे अर्थशून्यता
तरी उद्याच्या वाटांवर मांडली आहेत
बदसल्ला केंद्रे भ्रांतीपिल्यांनी
...धाप लागलेली आहे रक्तातून धावणाऱ्या विजांना
आणि ही फितूर माती
गर्भप्रवेशच नाकारीत फिरत आहे परत
माझ्या प्रतिभेतील नव्या निरोगी बिजांना....

●

या गाड्याला मागे जाणाऱ्यांनी इथवर आणले नाही
या गाड्याला पुढे जाणारांनी मागे जाऊ दिले नाही.
बदनाम असतात गतिपुत्र शिव्या-शापात
जळून जातात.
मरणाचेही बोट धरून त्यांची चाके पुढे धावून जातात.

●

सगळेच कोसळू लागले आहे तरी काय ?
माझ्यापाशी थांबेल कोसळण
माझे पोलादाचे पाय....

कोसळेल गगन, उठतील जाळ पायापुढे
मागून पेटणे पाठलाग करील,
पुढला रस्ता होईल मढे...
अर्ध्या हाकेवर उतरून येतील भ्रष्टाचारी
आणि त्यांचे जगज्जेते सैन्य
सत्यही होईल कदाचित फितूर
दुबळ्यांच्या इमानाला जाळील दैन्य
पंक्चर होऊन पडेल सूर्य
पक्षी जुगार मांडून झोपतील
आपलीच साल शेंड्याला गुंडाळून
झाडेही निमग्न नग्न फिरतील
माझे अग्निध्वज जाळून टाकल्याच्या वार्ता येतील
खाली उतरणाऱ्या गरुडांचेही रस्तोरस्ती
भव्य सत्कार होतील तेव्हाही
तेव्हाही कल्पनेच्या कबरेत बुडून
धुक्यात झोके घेणार नाही
जळतानाही जिद्दी जाग जपेन डोळ्यात
काळोख पांघरून निजणार नाही...

कवटाभर वर्षांपासून हे कबंध दारात
इतके पावसाळे पेरले आणि धडाच्या खिंडारात
रुजली नाही बी एकही
काळोख–कुंपणात बंद स्मशान
निखाऱ्यांचा एक ढिगारा उलथून पाडला
की दुसऱ्या ढिगाऱ्याच्या सत्तेत
अशी खंडित शिल्पांची लंका
एका चिरंतनाच्या वास्तूवर चोचा मारून
आपल्याच रक्ताच्या पुरातून वाहणारे
हातापायांचे बुडालेले दिवस
कुठल्याही दिशेने पाहिले तरी पुढे कबंध
पावसाळे आणि न रुजणाऱ्या बिया

इथे भिजले तिथे रुजले कुठे निजले रक्तात
शिणत कण्हत झाडवाडे पोटे घेऊन हातात
ज्या रस्त्यावर रक्त सांडले त्याला कोण बोळ देईल
निघून चालल्या झाडांसाठी कोण इथे न्याय होईल.
उगवताना गोठतो दिवस येतेवेळी रात्र रडे
दबा धरून मृत्यू मागे सरणे उभी पुढे

विजयासाठी आभाळाची बकरी करताना
मनगट ठेंगणे ठरून पुराला माघार घ्यावी लागली
तरी पावलांची जुडी बांधून अडगळीत टाकू नये
विषाच्या अपेक्षेप्रमाणे निष्प्राणून जाण्यापेक्षा
विष पचवायला मेंदूचे पोलाद पहाडी करीत राहावे.
आपल्याच गळ्यात फास आवळणारे हात
आपलेच असावेत
मग जीवनासारखी निरर्थक गोष्ट कुठे नाही
जखमांशी फुगडी खेळायला शिकावे
हनुवटी कुरवाळून हारलेल्या तलवारीला हसवावे.
म्हणजे दिक्काल कायम अंधारून येण्याचे टळते.

क्षणक्षणा हेचि समुद्रमंथन
कोणाचे आपण आपुले ते कोण

झुली पांघरले पांगले किनारे
सोयीचे सोयरे सावत्र माहेरे

भोळ्याभाबड्यांनी निवांत मरावे
घशात शिरावे लबाडांच्या

गळा कापणारे केस शिरजोर
चुलीचे लाकूड चुलीमध्ये

लबाडांचे ज्ञान मूढा पाजू नये
विष करू नये पॉप्युलर

बुडविते जन न देखवे डोळा
संतापाने भाळा आग लागे

क्षणक्षणा आता हाचि अविचार
पापांचे डोंगर पूज्य होवो

जन्मते बखर रंकांच्या युद्धाची
तुरुंगबद्धांची मुक्तगाथा

डोळ्यात फुलला उजेडाचा गेंद
नदी झाली धुंद काळजाची

उरात धावती वादळांच्या बागा
आभाळल्या शेंगा निखाऱ्यांच्या

जळतील वाटा संकटांचे स्फोट
संकल्पाची वीट फोडताना

निर्वाताहीपुढे रस्ते फुटतील
विद्धा भेटतील मर्मे सारी

खुलतील कांडे तमपटावरी
अभंगाच्या सरी नाचतील

गर्भार बखर दु:खांच्या यशाची
आणिक दिशांची वादळांच्या

बांधोनी धरण सडवले मेघ मरणासी संग सिद्धविला
कोण पाठीतील खंजिराचा गर्व जैसे की गाढव ओझेवाही !
शिळ्या भाषणांनी झोपविली पोटे पेटताती बेटे काळोखात
षंढ घोषणांनी आवळिले गळे कळ्यांचे वाटोळे झाले झाले
उष्टे खावोनिया करिती रवंथ नाही खेद खंत कुकर्मांची
नकाशाच्या रेषा चढविती नशा माणसांच्या पिशा रस्तोरस्ती
दगडांच्या साठी देऊळ उभारू माणूस अंथरू स्वार्थाखाली
तुच्छतेने आले आभाळ भरून विषाचे दुकान पूज्य येथे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

बोलवाया आले अनोळखी स्वप्न
नभाचे स्मशान पाऊसले

हंबरू लागली जखमांची शेते
वाऱ्यासवे नृत्य तारकांचे

मनाशी पाहिली शिखरे चोरुनी
मी त्यांच्या नयनी चंद्रगुंफा

व्याकुळले सुख फुगडी फुलले
रक्त आभाळले जात्यामध्ये

लबाडांच्या घरी कोल्हे कारभारी
जुगारी भेटले दारुड्यांना

विद्वेषाच्या घरी विषाची मैफिल
छिनाल भेटली वाजिंदीला

नपुंसका तारी वांझोटी बाईल
होईल तयांचे भले होवो

मृतांना सोयरे खड्डे आणि चिता
लाथां,--सर्व बुक्क्या इंजिनात

जिथे थांबला दिवस । तिथे थांबलो मी नाही,
कधी उसवले श्वास । तरी विसावलो नाही ।।

वाळलेल्या आतड्यांनी । पांघरले चार शब्द.
विजांच्याही पावसात । चाल सोडिली मी नाही ।।

छद्‌मी दळीत हासले । कधी वंचनेचे जाते,
उदासीच्या पायावरी । माथा विसर्जिला नाही ।।

होते पेटत माहेर । पशू झाली होती आग,
माझ्या शिवारात दारू । तरी पेरली मी नाही ।।

होते डोळ्यात शीर्षक । भोळ्या वंचितांशी नाते,
तुरुंगाशी भांडताना । कधी मोडलो मी नाही ।।

नभ भेटले फाटत । तम नाचले वेढत
दिठी-मुठीचे पोलाद । तरी विझू दिले नाही ।।

जोडूनी ठिकऱ्या जुळविला गळा
तमावरी डोळा मांडिला मी

विषनदीतूनी सूर्यविली होडी
मढ्यांची आघाडी सिद्धवाया

शतकसाखळ्या करोनिया ठार
उर झाले धार पूर्वेसाठी

रक्ताची दिवाळी देई रोज सुळी
मृत्यूची डहाळी झाले मन

कधीही पाऊस बदलितो दिशा
करितोचि पिशा संकल्पांच्या

पुसणार नाही आंधळ्यांना वाट
जाणतो पहाट मीच माझी

अग्निपोटातून काढिले हे वन
वस्तिला स्मशान नको आता

आले या कवेला लाव्ह्याचे आधण
मेंदूचे झाकण उडो पाहे

जळत्या इंधना फुटले नर्तन
पायी प्रभंजन अंगारला

जाणतो विषाची पाऊस शक्यता
गृहिताला चिता बांधोनिया

राखेसाठी नाही स्वप्नाशी सलगी
आगीत जिंदगी भाजिली म्या

न गाई कदापी नरकाची स्तोत्रे
न जाईन जत्रे आंधळ्यांच्या

चालल्या वाटेला बांधिले मी श्वास
भविष्या उपास पडो नेदी

देईन ना झोपू दु:खाला येथोनी
काळजाची धुनी लावोनिया

घेऊन बैसेन लांडग्यांना ताटी
न घडे कदापी कल्पांतीही

कशाला काढावी मयसभा खणून
मस्तके फोडून बैसावेया

कालचे जहर कुणा तारणार
आजचा खाणार जऱ्ही झाला

नंग्यांनी पाहिले कपडयांचे स्वप्न
तया निखंदून हित कैंचे

उपाशी पोटांनी भविष्य पेरिले
तयांशी मागले मृत्यू नको.

माझ्या देशा—

तू आम्हालाही आपले म्हण
तू सख्ख्या आईसारखा आमच्यासाठी पान्हा हो
आमच्या पडावांवरील फॅसिस्ट आभाळात
कुष्ट ज्योत्स्ना काळी क्रूर
आणि उगवतानाच जळायला लागतात यामिनी
आमच्या
कधी आठवणींनी
कधी वार्तांनी
कधी निखाऱ्यांच्या वादळी पावसाने
कधी भविष्याच्या गर्भातील क्रौर्यभयाने
तुझ्या गळ्यातील सर्पांनी
गळे धरलेत कि रे आमचे
आणि वेटोळून घेतले आहे आमच्या पंखांना
आमच्याही जगण्याची कधी कर बापा चौकशी
आमच्या मरणाने जागू दे तुझी अभंग निद्रा
आणि फुंकर घालून फुलव हे राखेचे ढिगारे
मरणाऱ्यांच्या उरात थोडे जगणे फुलव निधडे
माझ्या देशा !

माझ्या देशा—

आम्ही दगडांवर मस्तकांच्या आहुत्या देणार नाही
या शापाचे पाश तोडताना तू साक्षी रहा
हजारो वर्षांनंतर मागतो आहोत आम्ही प्रथमच उत्तरे
आणि आमच्या प्रश्नांनी तू भांबावून जाऊ नकोस
अरे कुडाकाटीची घरे आमची
आणि प्रश्नांची झड लावणारे तुझे अतिलाडके

सुकुमार
तुझी सुजले तुझी सुफले
आम्हालाही निदान दिसू दे.
ती आमच्याही वाट्याला येऊ दे प्रशंसापात्रा !
आम्हाला कळत नाही रे शब्दांतली दिवाळी
आणि बाल्कनीतल्या तुझ्या पोरांनी रचलेले
तुझे गौरवगीत आम्हाला दुर्बोध वाटते.
परदेशी वाटते.
आम्हालाही गळ घाल तुझे गौरवगीत लिहिण्याची.
हजारो वर्षे जळालेल्या भावना उभ्या केल्या
तरी कोळशांचे महाभारत रस्ते अडवील
पण आम्ही उगाळणार नाही कोळसे
अरे जन्मत:च वणव्यात सापडलो
तरी आमचाही जन्म झाला तुझ्याच कुशीतून
आम्हाला तुझा राग नाही माझ्या देशा !
पण तुला खिशात घालणाऱ्या कपड्यांचा
राग जरूर आहे.
तुला हतबल करणाऱ्या हातांचे हित तू
इत:पर करू नकोस
तुला लाज येऊ दे जरा तुला विद्रूप करणारांची
तुला " माझा " म्हणतात चोर
तुझ्यावर पोस्टर्स डकवतात लुच्चोर
तुझ्या पौर्णिमेचा मलिदा खातात हरामखोर
नाठाळांच्या माथी हाणायला काठी वागवायला शीक
माझ्या देशा !
माझ्या देशा—

तू जंगल होऊ नकोस
कोल्ह्यांना आणि सिंहांना करू नकोस सांस्कृतिक
सल्लागार. अस्वलांच्या हातात देऊ नकोस गळा

आणि बांधू देऊ नकोस गळ्याला दोरी
देऊ नकोस स्वातंत्र्य क्रूर श्वापदांच्या पंजांना
त्यांच्या सनातन दातांना !
माझ्या देशा—
तुझ्या कोडाचे कौतुक करणारांना तू तपासून घे
तुझा आजार तुझ्यापासून लपविणारांचे चेहरे
तू पाहून घे
तू आजवर मर्जीतले मानलेस खोट्यांना-भाटांना
आणि जळाते लागले भाटांच्या लहरीने खोपटांना
हुजरे हजेरी लावतात तुझ्या दरबारात
गोंडा घोळतात घोळक्याघोळक्यांनी
तुझ्या कुरूपतेची भक्ती करणारे राष्ट्रकवी
राष्ट्रवादी ठरले
आणि तुझ्या सुरूपतेची स्वप्ने पाहणारे बदनाम
आमची बदनाम नावे मस्तकावर कधी मिरवशील
माझ्या देशा !
माझ्या देशा—
तू चोरांची पारख करायला शीक. आमचा सल्ला घे.
लुटले गेले त्यांना विचार लुटारूंची नावे आणि पत्ते
बलात्कारितांना पूस बलात्काऱ्यांचे चेहरे
जखमांना विचार खंजिरांचे क्रौर्य
प्रेतांना विचार खुनाऱ्यांची गावे
माझ्या देशा तू आमच्या रक्ताने भिजलेल्या हातांवर
बाप म्हणून आपले नाव गोंदवू नकोस
आमच्या तरण्याताठ्या बहिणींना
या श्वापदांपुढे टाकून
आमच्या निर्वासित अब्रूवर तेजाब टाकू नकोस
अरे आम्हाला आमचाही सहारा नाही
तुही बेसहारा करू नकोस !
माझ्या देशा—

तुला रिचवले त्यांनी पोटात
तुझ्यापेक्षा त्यांनी पूजिली आतड्यांची इच्छा
पण तू वाढतो आहेस मायबापत्वाची तहान पेटलेल्या डोळ्यांत
त्या बदनाम झोपड्यांच्या काळोखातून
जाळलेल्या स्वप्नांच्या राखेतून
तू वाढतो आहेस अर्धपोटींच्या मोर्चातील पोटातून
तुझ्या डोळ्यावरून मनुस्मृती कंपनीचा गॉगल
त्यांनी कुणाला काढूच दिला नाही
फुल्यांना, आगरकरांना आणि आंबेडकरांनाही
तुझा मेंदू बाधला त्यांनी पुराणांच्या फडक्यात
आणि कुरतडून टाकले हृदय तुझे
तुझ्या पायात बिळे केली घुशींनी
स्थापिल्या सत्ता धंदेवाइकांनी
तुला केले त्यांनी रखवालदार आपल्या तिजोऱ्यांचे
तुला फाडून त्यांनी शिवले बुरखे
आपली गुन्हेगार तोंडे लपवायला सत्यापासून
तू दिवाळीचे रंगीत दारूकाम
तू स्नो पावडर त्यांच्या उखरलेल्या तोंडावर
तू मलम त्यांच्या कमरेच्या गजकर्णावर
आणि अवसानाच्या मेगांवर
माझ्या देशा तू उघडच डोळे
तू खचलेल्या कमरेने, किडलेल्या कण्याने
पाहाच तुझा ड्युरॅपॅक वापर !
माझ्या देशा—

अरे, मीही तुझे मूल पण निर्मूल मी
तुझ्या तारुण्याचा उपासक उपाशी मी
मी शिल्पकार तुझ्या सौंदर्याचा आणि कुरूप मी
तू माझी माय आणि
परका मी पोरका मी

माझ्या देशा ! आम्ही तुला मायबाप म्हणतो
आतातरी तू आम्हाला मुले म्हण
आसुसलो कधीचे आपला म्हणण्यासाठी तुला
आणि जिवलगा तू आमचा हिरमोड करू नकोस
आम्ही कधीच नव्हतो नाही स्वातंत्र्यविरोधी
पण स्वातंत्र्याचा चेहरा कुरूप करणारांना
आम्ही जरूर विरोध केला.
म्हणून त्यांनी तिसऱ्या चौथ्या वगैरेच्या
स्वातंत्र्याचे गणपती बसवले, उठवले
आणि पहिल्याही स्वातंत्र्याची वाट पाहात आम्ही
वाटावाटांवर
पहिल्या दुसऱ्या तिसऱ्या इत्यादी इत्यादीच्या
पारतंत्र्याच्या करवतीखालून.
करवती म्हणजे स्वातंत्र्य काय रे माझ्या देशा !
माझ्या देशा—
किती मारावे रे मनांना
कसे कसे जगवावे शरीरांना
अरे प्रेते रे ही. आमच्या हातात वाडवडिलांची
आणि आमच्याही मानेवर तरवारी
आताच तर ओठ पेटलेत रे शब्दांनी
आणि चार शब्दांनी आमच्या त्यांच्या कोटी
शब्दांचे डोळे पांढरे झाले.
आमचे कोवळे हात उदयाच्या सूर्याला हाका मारू लागले
आणि दिशा तरवारींनी ढगाळून आल्या.
त्यांनी आमच्या डोळयात रोवलेली मंदिरे
आम्ही उपटून फेकली आणि त्यांचे बहिष्कार
आमच्या आयुष्यावर नागवे नाचले.
माझ्या देशा
चोरांमधे आणि पोरांमधे तू फरक करायला शीक !
माझ्या देशा—

देशद्रोही आणि देशहितवादी यांच्या त्यांनी केलेल्या
व्याख्या कर त्यांना परत
बघ आमच्या डोळ्यांनी
विचार कर आमच्या छिन्नभिन्न मेंदूंनी
सत्यावरची कर दूर धूळमाती
त्यांनी केले आहे सत्य रफातफा
गाडले आहेत पुरावे पापांचे
तू ये फिरून इतिहासातून आमच्या मनांनी
ऐक या तहानेल्या भुकेल्या तडफडत्या सागराच्या
तक्रारी आमच्या कानांनी
पाहून घे प्रेतांचे पहाड-ढीग
ऐकून घे इतिहासभर सांडलेल्या रक्ताचे म्हणणे
आणि घामाचे कण्हणे.
माझ्या देशा ! उभे कर रे बेगुमान गुन्हेगारांना
आरोपीच्या पिंजऱ्यात.
तू पहा तुझी कुरूपता गवईभावांच्या डोळ्यात
कोटी कोटी पोचिरामांच्या रक्तात
कुठे कुठे दाखवू तुला तुझी कुरूपता
आणि या कुरूपतेचे समर्थ शिल्पकार
आज पेटले गुजरात उद्या तिकडे विहार
माझ्या देशा ! तू आमचाही देश आहेस !
तू आम्हालाही देश दे माझ्या देशा !

शक्य झाले असते तर
केवळ तुमच्याशी निर्णायक भांडण्यासाठी
मी तुमचा शोध घेतला असता मर्ढेकर
तुमच्या मुठीत तुमचे नाक
आणि डोळ्यांत दगडी भिवयी पाहून
वाङ्मयातील पुरोहितशाहीने
तुमच्या कवितेला पूजेत बसविले
म्हणून मी असलो असतो त्या कविसंमेलनात
यायचे तुम्ही कटाक्षाने टाळले असते.
तुम्ही नियतीवादाच्या डोहात मुक्काम ठोकला होता.
तुम्ही ज्याला हसलात, लाविलीत वासलात
ते बदनाम निशाणच तर गर्वाने
मी कोलंबस-खांद्यावर घेतले होते,
पराभव जीवास खात असताही
पराभव बाहेर पडणारांचे होतात
आत शिरणारांचे नाहीत होत.
तुम्ही आत शिरलात मर्ढेकर,
आणि कवचकुंडले मिळविलीत
हात टेकले, मस्तक वाहिले
आणि अभयदान मिळविलेत.
तुम्ही पंक्चरलेल्या रात्रीवाल्यांच्या शिबिरात शिरलात.
इकडे उगवणाऱ्या पोलादी रात्रींशी
तुम्ही अबोला धरलात.
दारिद्र्यरेषेखाली आणि संस्कृती-कुसाबाहेर
नव्या टायर–ट्यूब्जचा प्रचंड कारखाना
धडधडू लागला होता.

त्याकडे तुम्ही प्रसिद्ध पाठ फिरविली.

मुडदे म्हणजे काय हो मर्ढेकर !
दूरच्या उद्ध्वस्त दिव्यांनी कळवळून
तुम्ही माणुसकी उजळून घेतली
आणि इथली मुडदे–परंपरा पूर्वजन्मिच्या पापाचीच
फळे भोगीत होती ना !
म्हणजे अखेर मनूच्या पायांपुढेच
तुमचीही माणुसकी शहीद झाली !
एरव्ही परडी फुलांनी कुणासाठी भरली होती हो मर्ढेकर ?
पृथ्वीची तिरडी तर कायमच जळत होती
सर्वत्र नंग्यांसाठी !
घडलीच असती आपली भेट तर नक्कीच तुम्ही
'त्याच्या' हाताखालील स्विच आणि
आभाळापल्याडील स्पंदनाचे हवाले देऊन
गिरणगावासंबंधी आणि इतरही अगण्य-नगण्यांसंबंधी
बोलायचे टाळले असते.
कोणाचे, किर्तीचे आणि कोणत्या मूल्यांचे बुरूज
ढासळले होते हो मर्ढेकर !
सुर्वे म्हणतात तसे तुम्ही खरेच कोणाचे लोभी झालात !
नुकतेच ज्यांचे भूगर्भातून उफाळून येत होते बुरूज
आणि नव्यातरण्या उत्साहाचे मनगटात
उगवू लागले होते तेल
त्यांचा लोभ तुम्हाला का पडला नाही हो मर्ढेकर !
तुम्ही शेवटी मानवतेच्या महाप्रवाहातून
मूठभरांच्या प्रस्थापित वर्गबोलीतच शिरलात की नाहीत !
तसे सुर्वेही न सोडलेल्या माहेरी परत निघालेले.
बोला आता मर्ढेकर ! बोला फलाटदादा !
मालगुंडवाल्यांची बात कशाला करता सुर्वे !

हे आपल्या गुंजेच्या झाडाला
त्यांचे फणस चिकटवणे झाले.
ते आमचे पहिले जातिवर्णमुक्त
जुने मरणालागून पाठवले आणि सर्वांशी
भावंड-नाते जोडले.
ते रिव्हर्सले नाहीत
रिझर्व बँकेत पुन्हा डिपॉझिट झाले नाहीत.
पेठ बदलली नाही म्हणून त्यांना तिष्ठावे लागले.
ज्यांच्यासाठी त्यांनी अंगार फुलवला आणि झेलला
त्यांच्यात त्यांना मोठे करण्याचे बळ नव्हते.
पाठीशी कुणी पार्टी नव्हती.
आणि रूढि-पुत्रांनी त्यांच्या कवितेला विष पाजून पाहिले
पण मर्ढेकर, तुम्ही मावळलात ती बिनचेहऱ्याची
संध्याकाळ—पंक्चरलेली रात्र तुम्हाला तारू शकली नाही.
आणि माणुसकीसाठी वणव्यात नावा झोकणाऱ्या
कोलंबसांशी तुम्हाला नाते सांगता आले नाही !
....मालगुंडवाल्यांची बात कशाला सुर्वे !
मर्ढेकर ! तुम्ही मुंग्यांसाठी मुंगी होऊन कळवळलात
पण हजारो वर्षांच्या सरंजामी शृंखला तोडून
मैदानाकडे झेपावणाऱ्या सिंहाच्या सत्कारांत
का आला नाहीत ?
सुर्वे ! देहूच्या वाण्याचा कुठे निकाल लागला !
तो तर डाव्या उजव्यात सारखाच पंढरपूर झाला.
पहा मर्ढेकर ! मीही जडवादी आणि सुर्वेही
पण आमचे निष्कर्ष असे का बदलत आहेत ?
हा समजुतीचा घोटाळा की घोटाळ्याची समजूत ?
सुर्वे ! गणपत वाण्याने माडी बांधली.
गाडीही दारात बांधली.
आणि विधानसभेत फाडफाड बोलत असला तरी
तो आहे जन्मांधच.

' एक मागता डोळे दोन 'मधून त्याची सुटका नाही,
' नेपा 'चा नवा कारखाना काढूनही !
पण हेच गणपत आज दलितांचे डोळे काढीत
कुणाला होळीत टाकीत,
गरिब-दलितांच्या बाया नागव्या करून फिरवीत आहेत
ह्यांचेही बखरकार, पोवाडेकार आता निघत आहेत
बोला आता सुर्वे !
मर्ढेकर ! तुम्ही दुःखाला लोखंडपूत-यंत्रसूत म्हटले
आणि धातू-आकलनाची नवकविता लिहिली.
अंतराळ आणि माणूस यांच्या आकारांच्या अप्रयोजक
तुलनेत तुम्ही माणसाच्या लहानपणाने व्याकूळ झाला
आभाळाच्या पल्याड स्पंदन हा तर
कर्मविपाकी वेदान्त झाला. हे तुम्ही काय नवे म्हटले ?
ही तर चुकीची दुरुस्ती झाली
हे तर विद्यापीठवाल्यांच्या मनातलेच झाले
....सुर्वे ! तुम्ही मर्ढेकरांच्या भक्तांत
कोणत्या नात्याने शिरलात !
साठीकडे झुकताच म्हातारे होऊन गेलात !
कसे समजवायचे हो सुर्वे आम्ही मनाला !
मर्ढेकरांशी ते भेटते तर कडाडून भांडलोच असतो.
पण आता त्यांच्या भेटीची कल्पना करायला
मी अध्यात्माशी कोणतेही नाते बाळगून नाही.
पण तुमच्याशी मात्र जरूर कडाडून भांडायचे होते
पण तुमचीही बऱ्याच दिवसांत भेट नाही....
बरेच झाले !

कवींचा अहंकार फार मोठा असेल नसेल
माझा अहंकार मात्र नक्कीच फार मोठा आहे
ज्या शस्त्रांनी गरिबांची शतके कापली
त्या शस्त्रांच्या-शास्त्रांच्या आरतीत मी येणार नाही

ठेकेदार न म्हणोत मला कवी, गाडोत उपेक्षेच्या खंदकात
तुम्ही व्हात्रे जुने टाळ पुन्हा हाती घेऊन तिच्यात सामील
मी केसांच्या गळयात गळा घालणार नाही
तलवारींना गळ्यांत पट्ट देणार नाही
....राखेच्या ढिपळांची अशी प्रस्तावना असते म्हणतात !

१

क्रांती-सावित्री !
बिनचेहऱ्याच्या हातावरील मिटवून
रेषांची दुकानदारी थांबलेल्या
तू बांधलेस प्रश्नांचे पेटते पलिते
राखेच्या बेचिराख पदरांना
निर्वासित क्षितिजांच्या विझलेल्या मुद्रांना
पावलाखाली सुरुंगांच्या पायघडया तुडवीत
हात उभारून तू बोलावलेस
सिमेंटच्या खांबावर फुलणारे मयुराकाश !

२

वटसावित्री जन्मभर करून
जन्म वठवू वा विटवू शकली असतीस परंपरेने
रामकृष्णहरिच्या गजरात गुजरले असते आयुष्य
दु:खाच्या मुखमृत ओहोळासारखे
नशिबाच्या लोखंडी पुलाखाली झाली असतीस,
सिंधूधर्माचा पूज्य आदर्श
ऊर्फ जखमा जखमा माती माथी
पण नाचवित नजरेत हात, हृदये आणि मेंदूच्या
विराट मोर्चाचे दृश्य
चार भिंतींत कोंडलेल्या
पोलादी पदरात गुदमरलेल्या
वाळवंटाचे रडणे रडणाऱ्या दु:खांच्या ओठी
तू लावलेस शब्दांचे सरोवर
पुरुषाच्या अंगाखालील स्मशानासाठी

चुलीसोबत जळणाऱ्या विझणाऱ्या
अंधारातील चितांसाठी
फुलविलीस तू विद्रोहाची अष्टदल कमले
मारणारा पती असो मृत वा जिवंत
स्वत:च्याच चितेत क्षणोक्षणी
उड्या घेणाऱ्या नरकाच्या राजवटीची
पहिली वज्रलिपी तू क्रांती-सावित्री

३

पदरात निखारे घेऊन तू जायचीस
रोज धगधगते कुरुक्षेत्र लाथाडीत
गळून पडले नाहीत तुझे शास्त्र झालेले हात.
आयुष्याच्या खराने मिटवीत
मस्तकांवरील ब्रह्म्यासटवीची छिनाल कारस्थाने
क्रांती-सावित्री !
किती गुणाकार अंधाऱ्या अंतराळांचा तुझ्यापुढे !
मेघमंडळाला प्रश्नांनी गुदमरवीत किती धावले
ओढे नाले !

४

तू निर्वातात पेरल्यास वादळांच्या बागा
आणि नरकांशी तंडलीस हातांनी
मरणदऱ्यांशी भांडलीस लाथांनी
नक्षत्रे गोंदलीस घराउरातील गगनमृत्यूवर
स्वत:पासून लपवीत आपले हंबरणारे काळीज
तू वापरलीस कूस क्रांतीसाठी
आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केलेस भिंतींना
मुठीत चिरडलेस सुरुंगांना
आणि भरवल्यास सभा प्रभेच्या
कपाळांच्या वाळवंटात

तुझ्या पेटत्या पदराने शिलगाविले काळीज माझे
आणि मरणाच्या छातीवरील
तुझ्या पावलांच्या खुणा
चिरंतन प्रेरणास्मारके डोळ्यात माझ्या
क्रांती-सावित्री !

५

क्रांती-सावित्री !
तू जमीनदोस्त केलेली दौलताबादेच्या किल्ल्याची भिंत
आणि शनिवारवाड्याचा वेढा
पुन्हा लिंपून अभंग केलेला
आजची वीज वापरणाऱ्या
कालच्या अंधारात चुरगाळलेल्या चित्रांनी
....पावलांपुढच्या वाटांनी उभा संप पुकारलेला
आणि तुझे वज्रायुष्य गळ्यात गुलमोहोर
जळत्या उकळत्या रेषांचा अघोरी गुंता
गळ्याभोवती निर्दय निर्दय
स्वप्नांच्या आकृत्या हरवलेले शब्द
पेटत निष्पर्ण काळजाच्या अंतरिक्षात
या सुरुंग पेरलेल्या वावरातून चालताना
तुझ्यासारखे चारदोन दिलासे उरलेले उरात

६

कोसळणारा तिरस्कार अंगावर
जाळीत काळजाच्या मशालीने
आणि भूतवर्तमानाच्या बहिष्कारात उभारलास
सुपल्या टोपल्यांचा संसार
गावकुसापार जुळवीत राखेच्या ढिपळांची यमके
ओसंडत अंगार तुझ्या महापूर हालचालीत
त्यांनी तरीही ऑक्सिजनवर ठेवली मनुरात्र
पगड्यांच्या चिखलमातीने केला तुझा सत्कार

जानवी थुंकली मानवी उदयावर
तू चेंचलास सनातन कुंटीणखान्याचा कणा
ती ' वट 'सावित्री स्त्रीगुलामीचे विषारी मिथ
आणि नव्या प्रबोधनाचे समर्थ स्त्रीमिथ
तू क्रांतीसावित्री !
तू स्त्रीमुक्तीचे सरळसरळ आडनाव
तू बीजकथा स्त्रीउदयाची
आमचा समग्र प्रश्नकाळ आज तुझ्यासाठी
आकांताची हाक !

७

पापाची उतारपेठ उल्लंघून गेलीस तू चढून
ज्वालांचे जिने आणि गोठवले दारातच
जाहिरातदारांना पापाच्या
तू मुक्याने मेली नाहीस सावित्री
मेले मरणच तुझे मुक्याने
संतोषीच्या उपासांनी तुझे स्वप्न मात्र
उपाशी मारले
तू सण विद्रोही युगाचा
पण फुले आंबेडकरांच्याही युगात
' सावित्रीच्या गळ्यात धोंडा
संतोषिस मणिहार
मनूतेरा महिमा अपरंपार '
ही कृतज्ञतेची खानदानी वहिवाट आमच्या
सावित्री !

८

क्रांती-सावित्री ! तू झेललीस गू-घाण अंगावर
आणि काळजावर कोसळणाऱ्या जहराला हरवलेस
तू घातलीस आग मढ्यांच्या आळ्यात

तरी फुले पडतात संतोषिच्या गळ्यात
अशी तऱ्हा आजारी वेलींची
मोग राफु लला मो गराफु लला
कृतघ्नते तुझा विषारी वेल आकाशमांडवावर जावो

९

तू कृतींनी शिल्पित होतीस
बिनचेहऱ्याच्या प्रवासाची घटना
जाळत होतीस चितांच्या उजेडात
सतींच्या वाट्याला आलेल्या वाटा
मोक्षमार्गीच्या धोंडी मोक्षाच्या मस्तकात हाणून
कोल्ह्यांच्या धर्मांचा पिरगाळलास कान
सावित्री !
वटसावित्रीच्या उरावर
क्रांती-सावित्री तू !

१०

दिवस उगवतात बलात्काराचे मुकुट घालून
अब्रूच्या टरफलांवर नाचतात मग्रुरीचे रथ
बदल मागणाऱ्या जिभांवर फिरतात तरवारींची पाती
गावोगावी जळू लागली उगवणारी दुबळी माती
पशूत्वाभोवती वाढत्या उत्साहाने नाचत आहेत
बेशरम आरत्या
आणि वर्तमानाचे बहिरेपण टार सांस्कृतिक
पुसतो त्या वटसावित्रीला
'कन्हैया तेरा क्यों नहीं दौडा आया ?'
आणि या प्रश्नाने पेटलेल्या संचिताची होते
केवळच चिमुटभर राख
क्रांतीसावित्री !
विषारी संस्कृतीच्या शरपंजरी आमची विखुरलेली
बेटे

डोक्यात गांगरलेले वादळ
अगतिक 'मनगट'
शरमिंदे 'मन' बेशरम 'गट'
आणि निर्माल्य होत तुझी पोरे पोरी
वेळोवेळी फिनिक्स पक्ष्याचे पंख कापणारी
तरवार-हवा मोकाट सुटली आहे
क्रांती-सावित्री !

११

तू जोतिबांची सखी ज्वालाग्रही जिवंतता तू !
वणव्याला लाजवीत बुद्धाची धगधगती भिक्षुणी तू
मार्क्सची सत्यशोधक क्रांतिप्रेरक कॉम्रेड तू !
आंबेडकरांच्या अंगारप्रतिभेचा क्रांत्युत्सव तू
तू उजेडफुलांचा सडा
स्त्रीमुक्तीच्या आंदोलनाची रक्तध्वजा तू
दलितांचा दीपोत्सव तू
आदिवासिंच्या अंधारातील विजांची वर्दळ तू
क्रांती-सावित्री,
आमच्या संग्रामातील ज्वालाग्रही बॅनर तू
आमच्या खिन्नतेत मोहोरणारे
विद्युत्माहेर तू !

वेगळे नव्हतेच तुझ्या पदरातले तुझे वसंत आणि शिशिर
म्हणूनच केले नाहीस वादळाला भिंतीच्या किनाऱ्यात कैदी
विजांचे लोळ झेलीत वेळोवेळी तू पाहिलीस सवयीने
ढगांतून उधाणून बहरणाऱ्या धारा-गंधारांची परिचित वाट

मी पावसासारखा कोसळणारा कधी हंबरत्या शेतात
तगमगत कधी निर्दय वनात तापलेल्या तव्यांच्या
तुझ्या नितळ कालवाकालवीने झाली जखमांचीही फुले
अशी जीव अंथरत आलीस वाटेवर निर्यमक प्रपाताच्या

ढगाच्या सावलीगत धावणारी तुझी विजयी ससेहोलपट
रुसली नाहीस कधी नादातच उफाळत्या पुराच्या पाण्यावर.
ढेकर दिलीस वाऱ्यातून वेचलेल्या सुगंधानेही वेल्हाळत
मिळाले तेवढ्याने पौर्णिमा झालीस सुख फुलवलेस फुफाटयावर

कधी निखारे झालो कधी झालो निर्णायक मध्यान्ह
तरी तुझ्याच शक्तिशाली समजुतदारपणापुढे अंगाराला आगही लावली
क्षमा कर दरवेळी तुझ्यापुढची आस्तिक चाकोरी मोडल्याबद्दल
माझ्यासोबत नास्तिक झालीस, लहरींसोबत चांदण्यांच्या वेली

वितळून जातात कृतज्ञतेने मनाचे उडते वज्रपहाड
तुझ्या दुराव्यात तुझ्यासाठी गळ्या-डोळ्यात ढग पिळवटून येतात
क्षमा कर उण्यादुण्याची क्षमा कर या आग लागलेल्या हृदयाला
तुझ्याच अथांग सावलीत माझ्या झपूर्झाचे चंद्रसूर्य नाचतात.

उरातील उग्रते
चेतव अणुरेणूंचा समग्र पसारा
दे उडवून हाहाकार
सत्याच्या मारेकऱ्यांसाठी हो ज्वालाग्रही
क्षणाक्षणाच्या उफाळातून अधिकाधिकच विध्वंसाग्रही
हरिनामाचा गजर होतो आहे ढोंग्यांचे कवच आजही
विष पसरतच आहे आपले निर्लज्ज हातपाय
उग्रते !
तुझे बोलणे होऊ दे तरवार आता नवनव्याने
होऊ दे चालणे धुवांधार
तुझे पाहणे अथांग अंगार
घुसव अंतराळाच्या उरात भग्नांच्या बांधिलकीच्या अग्निध्वजा
चढव भडकव मशालींचा ताडा
वर्तमान आणि भविष्य यांच्यामध्ये उभार
तुझ्या मज्जेचा अभंग सेतू
शतकांनी लाजवावे आभाळाला
गौरवावी माणसांची विस्तवातून झेपावलेली उंची
शतकांनी सत्कारावे स्वतःस माणसांच्या उंचींना परोपरींनी
पण गुढगाभर उंचीच्या शतकांनी माजविला आहे
इथे कहर !
बुद्धीने करावे शतकांचे नेतृत्व
पण झुडुपांनीच श्रद्धांच्या पावसात
काढले आहे दिवाळे आजवरच्या प्रवासाचे
जरा नजरेनेही जात आहे लांडग्यांची मिरास गडगडून
उभारलेले दंभाच्या खांबावरचे भ्रममंदिर
संस्कृतीच्या गाभाऱ्याबाहेर

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
२५२९
२०६३६
१५४८५
शाखा (स्थळ प्रत)

पाय ठेवला नाही ज्या बनवेशाहीने
पाकळ्यांचा मुखवटा उतरविला नाही ज्या भयग्रस्त क्रौर्याने
त्या सुस्त सुप्त विश्रांतीला ओढताच जरा मैदानात
कशी झाली आहे बेचैन कोमलांची निज !
इतिहासभर नाही हृदयांचा पत्ता
पण डाव पलटताच वापरू लागली आहे हृदयाची भाषा
अशी ही खानदानी हृदयशून्यता
रांगत्या वादळांचे कापले जातात हातपाय
विद्रुपविला जातो नवी क्षितिजे जुळविणारा चेहरा
....एकतर चुलीबाहेर येऊ इच्छित नाही
चुलीत जळणारा
अशी ही जन्मजात जळिते
पण तुला अपरिचित नाहीत केसाने गळे कापणारे ळळे
तुझे अनुभव तुझ्या आयुष्याच्या अजिंठ्यात
जखमांची अभंग शिल्पे
तुझे सुख दु:खांच्या निबिड जंगलातून पाहिलेले स्वप्न
...उग्र होई उरातील उग्रते
होई महाउग्र तू प्रलयाहून
मांड निर्वाण या वणव्याच्या वास्तवात
बांध मातीच्या कणाकणात विजांचे पैंजण
ओठाओठांत जडव मुक्यांच्या हुंकारांचे विराट
होऊ दे या विषपसाऱ्याचे निर्णायक समुद्रमंथन
माझ्या कवितेच्या तनामनात
ठेवू दे आजच्याही हलाहलावर विद्रोहाचा विजयी पाय
होऊ दे कवितेला निर्णायक माझ्या.

REFBK-0024656

REFBK-0024656